# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, यशवंत नगर, विरार (प.) जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०३
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com


---

**विभाग :- सार्व. बांधकाम**

**प्रशासकीय ठराव क्र.**७५६ **दिनांक :**२८/०४/ **२०२५**

---

**प्रस्तावाचा विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील पावसाळयापूर्वी करावयाची अति आवश्यक कामे करणेकामी शासनाकडून निधी उपलब्ध करुन मिळणेबाबत.**

**प्रस्तावाचा मजकूर :-** वसई - विरार शहर महानगरपालिकेची स्थापना ३ जूलै, २००९ रोजी झाली असून त्यामध्ये भुतपूर्व ४ नगरपरिषदा व परिसरातील ५५ गावांचा समावेश आहे. महापालिका क्षेत्राची सन २०११ च्या जनगणनेनुसार १२.२३ लक्ष इतकी लोकसंख्या असून सद्याची अंदाजे २४ लक्ष इतकी लोकसंख्या झाली आहे. महापालिकेचे क्षेत्रफळ ३१९.३९ चौ. कि.मी. इतके विस्तारीत असून बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रालगत व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या विकास क्षेत्रात येत आहे. वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्राचा नागरीकरणाचा वेग इतर शहरांच्या तुलनेत जास्त प्रमाणात असून लोकसंख्येतही मोठ्या प्रमाणावर वाढ होत आहे.

वसई - विरार उप प्रदेशात पश्चिम रेल्वे अंतर्गत विरार, नालासोपारा, वसईरोड, नायगाव व वैतरणा ही ५ उपनगरी रेल्वे स्थानके येत असून कामण व जुचंद्र ही मध्य रेल्वेच्या अखत्यारीतील स्थानके येत आहेत. राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ पासून महापालिका क्षेत्रातील प्रमुख शहरांकडे येणारे ५ मुख्य डांबरी रस्ते तसेच शहरांना जोडणारे मुख्य रस्ते व अंतर्गत रस्ते अस्तित्वात आहेत. वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील बहुतेक ठिकाणी बशी (सॉसर) सदृष भाग आहे. पर्जन्यमान हे २७०० ते ३००० मि.मी इतके असून अतिवृष्टी काळात बहुतेक ठिकाणी जलमय पूरस्थिती निर्माण होते व त्यामुळे दळणवळण व्यवस्था ठप्प वा वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. यामुळे आजारी माणसांना रुग्णालयात जाण्यासाठी वा नोकरदार वर्गास वाहतुकीकरीता त्रास सोसावा लागतो.

मुख्य रस्त्यांव्यतिरिक्त अंतर्गत रस्त्यांवर पाणि साचल्यामुळे वारंवार रस्ते खराब होतात तसेच सदर ठिकाणी पाण्याचा निचारा न झाल्यामुळे नागरीकांची गैरसोय होत. त्यामुळे दुरुस्तीवर देखिल जास्त वार्षिक खर्च होत आहे. सदरचा वार्षिक खर्च कमी करणेच्या दृष्टीकोनातून या ठिकाणी पावसाळया पूर्वी करावयाची अति आवश्यक कामे केल्यास पाणी साचणाऱ्या ठिकाणी

पाण्याचा निचरा लवकर होईल. याकरीता वारंवार पाणी साठणाऱ्या ठिकाणांचे सर्वेक्षण महानगरपालिकेमार्फत करण्यात आले असून सद्यस्थितीत ४ ठिकाणी तातडीने करावयाच्या कामांकरीता ४ पैकी ३ सविस्तर अंदाजपत्रके महापालिकेचे पॅनल वरील मंजूर तांत्रिक सल्लागार मे.सबडक्शन झोन कंन्सल्टंन्सी हयांच्यामार्फत तसेच १ अंदाजपत्रक महानगरपालिकेच्या अभियंत्याकडून तयार करून घेण्यात आली आहेत व आवश्यक कागदपत्रे, नकाशे, आराखडे व बाबींची पुर्तता करण्यात आली आहे. सदरची कामे पुढील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | कामांची नावे | रक्कम रु. |
|---|---|---|
| १ | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (प.) येथे पाटणकर पार्क सिग्नल ते हनुमान नगर सर्कल ते मैत्री अपा. ओपन नाल्यापर्यंत अस्तित्वात असलेले गटार नव्याने बांधणे . | रु.१२,८९,४४,३४४/- |
| २ | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील नालासोपारा लिंक रोड येथे शनी मंदिर ते लक्ष्मीबेन छेडा सर्कल पर्यंत रस्त्याची उंची वाढविणे व रस्त्याच्या दोन्ही बाजूस गटार बांधणे. | रु.१२,२२,६७,१९२/- |
| ३ | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (प.) श्रीप्रस्थ ४ था रस्ता येथे आरक्षण क्र.३६१ ते सॉलिटेअर बिल्डींग ते इम्पेरिअल शेल्टर पर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूस गटार बांधणे व डी.पी.रस्ता विकसित करणे व सॉलिटेअर बिल्डींग जवळ ब्रीज बांधणे. | रु.१६,०५,४८,९०३/- |
| ४ | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती (बी) कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ५२ व ५४ मधील तुळिंज पोलीस चौकी ते ओस्तवाल नगरी पर्यंत पूरस्थिती नियंत्रणासाठी आर.सी.सी गटार बांधणे. | रु.१३,७७,४२,३११/- |
| | **एकूण** | **रु.५४,९५,०२,७५०/-** |

वरील कामांकरीता मोठ्या प्रमाणावर निधीची आवश्यकता असून महापालिकेची आर्थिक परिस्थिती पाहता सदर कामे महापालिकेमार्फत करणे शक्य नाही.

तरी वरील नमूद कामांसाठी आपत्कालीन अनुदान अंतर्गत निधी उपलब्ध करुन देण्यासाठी सदर कामांना प्रशासकिय व वित्तीय मंजूरी मिळणेकामी मान्यतेस्तव सादर. सदर कामे पावसाळयापूर्वी करावयाची असल्याने प्रस्तावित कामांना शासनाकडून निधी प्राप्त करून घेण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात यावा असे प्रस्तावित.

वरील प्रमाणे तयार करण्यात आलेला प्रस्ताव आवश्यक अंदाजपत्रकासह नकाशे, आराखड्यासह शासनाकडे सादर करणेकामी सोबत जोडले आहेत.

सदर प्रस्तावास मा. महासभेच्या मान्यतेची आवश्यकता आहे. सद्य:स्थितीत शासनाने महापालिकेवर प्रशासकाची नेमणूक केली असून मा. आयुक्त यांना सदरचे अधिकार प्रदान आहेत.

तरी वरील नमुद पावसाळयापूर्वी करावयाच्या कामांसाठी शासनाकडून आपत्कालीन अनुदान अंतर्गत निधी उपलब्ध करुन मिळणेकामी सादर करण्यास मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या मान्यतेस्तव सादर.

**प्रस्तावाचा निर्णय** :- १. महापालिका क्षेत्रातील ४ ठिकाणी पावसाळयापूर्वी करावयाची अति आवश्यक कामांच्या सादर केलेल्य प्रस्तावास मा.आयुक्त तथा प्रशासक यांची विषयांकीत ठरावान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. वसई विरार शहर महानगरपालिकेने वरील प्रस्तावित ४ कामे करणेकामी रक्कम रु.५४,९५,०२,७५०/- किमंतीची अंदाजपत्रके तयार करण्यात आली असून त्यास महापालिकेची प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

३. वरील प्रस्तावात नमुद ४ कामे आपत्कालीन अनुदान अंतर्गत निधी उपलब्ध करून देणेकरीताचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनास सादर करण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे.

२८/०५

**अनिलकुमार पवार (भा.प्र.से)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

# वसई विरार शहर महानगरपालिका

**प्रशासकीय ठराव क्र.** ९५८

**विभाग : घनकचरा व्यवस्थापन**

**दिनांक :** २८/०४/२०२५

प्रस्तावाचा विषय :- घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत महापालिका कार्यक्षेत्रात कापडी पिशवीचे वितरण करणेकरिता ई-निविदा प्रणालीद्वारे Automatic Cloth Bag Vending Machine खरेदी करणेकामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- प्लास्टिकच्या वापरामुळे व विल्हेवाटीमुळे विविध प्रकारच्या समस्या निर्माण होतात, ज्यामध्ये अविघटनशील प्लास्टिक कचऱ्याचे मोठ्या प्रमाणात नैसर्गिक अधिवास लँड फिल साईट्स वन्य व सागरी जीवांमध्ये असा कचरा खाल्याने किंवा त्यांच्यामध्ये अडकल्याने विविध समस्या निर्माण होऊन प्लास्टिक तयार करतांना वापरले जाणारे इतर रसायनांमूळे सागरी जीव वन्य जीव व मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम करित आहेत. त्याअनुषंगाने संदर्भ क्र. १ महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब, शुक्रवार, मार्च २३, २०१८/चैत्र २, शके १९४० रोजीचे राजपत्र व महाराष्ट्र शासन पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे दि.१०/०७/२०२४ रोजीचे परिपत्रकानुसार एकल वापर प्लास्टिक वापरावर बंदी असुन प्लास्टिकचे उत्पादक, वापर, विक्री, साठवणुक करण्यास मनाई आहे.

वसई विरार शहर महानगरपालिका अंतर्गत एकल वापर प्लास्टिक बंदी मोहिम राबविण्यात येत असून मनपा हद्दीत एकल वापर प्लास्टिक पिशवी न वापरता शहरात कापडी पिशवीचा वापर पुरेपूर होणेकामी प्रथम टप्प्यात एकूण १ लक्ष कापडी पिशवी बनवून त्या मनपा कार्यक्षेत्रात उपलब्ध करून देणेकरिता संदर्भ क्र. २ अन्वये मान्यता घेण्यात आली आहे. तरी, सदर कापडी पिशवी मनपा कार्यालये, सार्वजनिक ठिकाणे, बाजार इ. ठिकाणी नागरीकांना उपलब्ध होणेकामी Automatic Cloth Bag Vending Machine खरेदी करणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने संदर्भ क्र. ३ अन्वये Automatic Cloth Bag Vending Machine खरेदीसाठी विक्री करणाऱ्या विक्रेत्यांकडून बाजार भावाप्रमाणे दि.१७/१२/२०२४ रोजी ई-मेलद्वारे दरपत्रक मागविणेत आले आहेत. त्यानुसार दि.१०/०१/२०२५ रोजी ई-मेलद्वारे ३ दरपत्रके प्राप्त झाले आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | अभिकर्त्यांचे नाव | प्रति नग दर (GST सह) |
|---|---|---|
| १. | मे. इंडो मेडिकल हेल्थ केअर | ६६,०२१/- |
| २. | मे. इंडो सोर्स टेक्नोलॉजिस प्रा. लि. | ६७,२६०/- |
| ३. | मे. रूद्रा एंटरप्रायजेस | ६०,५००/- |

याकामी उपरोक्त प्राप्त दर हे सद्यस्थितीचे बाजारभाव दर्शवितात त्यास प्रमाण मानून त्याप्रमाणे मे. इंडों मेडिकल हेल्थ केअर यांची रक्कम रू. ६७,२६०/- (GST सह) इतक्या उच्चमत दरासाठी प्रशासकीय मान्यता घेण्यात येणार आहे. मात्र ई-निविदा

प्रणालीद्वारे जे दर प्राप्त होतील त्यातील लघुत्तम दराशी तुलना करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात एकुण २५ Automatic Cloth Bag Vending Machine खरेदी करणेकामी रक्कम रू. १६,८१,५००/- इतका अंदाजीत खर्च अपेक्षित आहे.

वरीलप्रमाणे उच्चतम दराच्या प्राप्त दरपत्रकामधिल दराप्रमाणे एकुण २५ Automatic Cloth Bag Vending Machine खरेदी करणेसाठी रक्कम रू.१६,८१,५००/- इतका अंदाजीत खर्च लेखासांकेतांक क्रमांक ३४०-२५७० 'स्वच्छ भारत अभियान एक व दोन' या लेखाशिर्षकामधून करण्यात येईल. तरी, घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत महापालिका कार्यक्षेत्रात ई-निविदा प्रणालीद्वारे दर मागवून एकुण २५ Automatic Cloth Bag Vending Machine खरेदी करणेकामी होणारा रक्कम रू.१६,८१,५००/- इतका अंदाजीत खर्च मनपा निधीतून करावयाचा आहे. तरी, होणारा रक्कम रू.१६,८१,५००/- इतका अंदाजीत खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकामी पूढील ठराव करण्यात येत आहे.

**ठराव निर्णय** :- वसई विरार शहर महानगरपालिका अंतर्गत एकल वापर प्लास्टिक बंदी मोहिम राबविण्यात येत असून मनपा हद्दीत एकल वापर प्लास्टिक पिशवी न वापरता शहरात कापडी पिशवीचा वापर पुरेपूर होणेकामी कापडी पिशवी बनवून त्या मनपा कार्यक्षेत्रात उपलब्ध करून देणेकरिता ई-निविदा प्रणालीद्वारे दर मागवून एकुण २५ Automatic Cloth Bag Vending Machine खरेदी करणेसाठी रक्कम रू.१६,८१,५००/- इतका अंदाजीत खर्च मनपा निधी लेखासांकेतांक क्रमांक ३४०-२५७० 'स्वच्छ भारत अभियान एक व दोन' या लेखाशिर्षकामधून करण्यात येईल. तरी, होणारा रक्कम रू.१६,८१,५००/- इतका अंदाजीत खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

२८/०५

अनिलकुमार पवार (भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

**प्रशासकीय ठराव क्र.** ९५८

**विभाग :- घनकचरा व्यवस्थापन**

**दिनांक :-** २८/०४/२०२५

**प्रस्तावाचा विषय :-** नागरी घनकचरा व्यवस्थापन दैनंदिन रस्ते सफाई, गटार सफाई व कचरा संकलन करुन क्षेपणभुमीवर वाहतुक करणेसाठीच्या त्रैवार्षिक निविदेस मुदतवाढ देऊन होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूरः-** नागरी घनकचरा व्यवस्थापन हाताळणी अधिनियम २०१६ अन्वये महानगरपालिका अंतर्गत असलेल्या प्रभाग समिती निहाय २० झोनसाठी दैनंदिन रस्ते सफाई, गटार सफाई व कचरा संकलन करुन क्षेपणभुमीवर वाहतुक करणे इत्यादी कामांसाठी सन २०१८-१९, २०१९-२०, २०२०-२१ या त्रैवार्षिक वर्षाकरिता सर्वसाधारण सभा ठराव क्र.२६ दि.२०/०२/२०१७ रोजी प्रशासकीय मान्यता घेऊन दिनांक ०२/०३/२०१७ रोजी ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली होती.

सदरील निविदेमध्ये आलेल्या दरास मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.४४९ दिनांक १२/१२/२०१७ अन्वये प्राप्त दरास मान्यता देऊन घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत दैनंदिन रस्ते सफाई, गटार सफाई व कचरा संकलन करुन क्षेपणभुमीवर वाहतुक करणे या त्रैवार्षिक निविदेच्या प्रक्रिये अंतर्गत प्राप्त झालेल्या निविदाधाराकांपैकी कमी दराच्या निविदाकारांच्या दरास मंजूरी देऊन करारनामा करुन कार्यादेश देणेस मंजूरी दिली होती. त्याअनुषंगाने दिनांक ३०/०१/२०१८ रोजी करारनामा करुन दिनांक २०/०२/२०१८ रोजीचा निविदाकारांना कार्यादेश देण्यात आलेला होता. याकामी सन २०१७-१८, सन २०१८-१९ व सन २०१९-२० या त्रैवार्षिक वर्षाकरिता २० झोनमध्ये २० अभिकर्त्यांची नियुक्ती केली असून सदरचे काम १ वर्ष उशिरा सुरू झाल्याने कार्यादेशानुसार सदरच्या कामची मुदत १ वर्ष (सन २०२०-२१ पर्यंत) वाढवून दिलेली होती.

परंतु सदर निविदेचा कालावधी दि.२८/०२/२०२१ रोजी संपुष्टात येत असल्याने प्रशासकीय ठराव क्र.५७८ दि.०८/०३/२०२१ अन्वये पुढील ६ महिन्याकरिता कोणतीही भाववाढ न देता प्रथम मुदतवाढ मंजूर केलेली होती. त्यानंतर प्रशासकीय ठराव क्र.३४७, दि.१२/०७/२०२१ अन्वये सन २०२१-२२ ते सन २०२५-२६ या पाच वर्षाच्या कालावधीकरिता निविन ई-निविदा प्रक्रिया करणेस प्रशासकीय ठराव मंजूर करण्यात आला होता आणि दि. २०/०७/२०२१ रोजी जाहिर ई-निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती.

सदर निविदा प्रक्रिये विरुद्ध विद्यमान ठेकेदार मे. श्री. अनंत इंटरप्रायजेस, मे. रेन्बो कन्स्ट्रक्शन, मे. उजाला लेबर कॉन्ट्रॅक्टर, मे. साई गणेश इंटरप्रायजेस, मे. रिलायबल एजन्सी, मे. हेना इंटरप्रायजेस, मे. मेनदीप इंटरप्रायजेस, मे. शिवम इंटरप्रायजेस यांनी मा. उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केली होती. सदर याचिका **"मे. श्री. अनंत एन्टरप्रायझेस व इतर विरुद्ध वसई विरार शहर महानगरपालिका"** मध्ये मा. उच्च न्यायालयात Writ Petition no 4964/2021 मधील Interim Application No.2153/2021 आणि Interim application no.4338/2023 मध्ये खालीलप्रमाणे निर्देश देण्यात आलेले आहेत.

| Sr. No. | Writ Petition no | Order |
|---|---|---|
| 1 | Writ Petition no. 4964/2021order dated 15/09/2021 | **a)** In view of the aforesaid statement in the Affidavit-in-Reply, we are of the view that no useful purpose would be served in opening the bids at this juncture and it would be in the fitness of things, that the opening of bids be deferred, in as much as there is likelihood of the election |

| Sr. No. | Writ Petition no | Order |
|---|---|---|
| | | of the Respondent-Corporation being held in the near future and the standing committee of the Respondent - Corporation would be in place. It is required to be noted that the administrator (i.e. Respondent No. 2 Municipal Commissioner) was appointed for the respondent- corporation only because the tenure of the general body of the Respondent-Corporation had expired and election have been postponed due to the covid-19 pandemic. We also note that the tender value is about Rs. 661 crore.<br>**b)** The petitioners/ Respondent -Corporation would be at liberty to move the court to seek further ad- interim relief and/or to vary this order in the event the election are held and /or the six (6) month period of the contracts of the petitioners are to come to an end. All contentions of the parties are kept open for the purpose of the grant or refusal of ad-interim/ interim relief, which may be considered without being influenced by this order. The petition is pending before the hon'ble Court. |
| 2 | Interim application no. 2153/2021order dated 14/02/2022 | Without prejudice to the rights and contentions of the Applicants/ Petitioners, in as much as the Applicants/ Petitioners have already granted extension of contract for of six months, we permit the Applicants/ Petitioners to make representation for further extension. If such Application is made within four days from today, the same may be decided within two weeks from the date of the representation. |
| | Representation made by petitioners on dated 23/03/2022 | On dated 06/04/2022 order passed, The time limit given by the Hon'ble High Court for the first six months has expired on 28/02/2022 and as the elections have not yet taken place , the time limit has been extended by one month. The decision must be communicated to the High Court. |
| 3 | Interim application no.4338/2023 order dated 03/05/2023 | The learned counsel for the petitioners, on instructions, submits that the petitioners would avail the remedy before the Arbitrator. |

| Sr. No. | Writ Petition no | Order |
|---|---|---|
| | Arbitration proceeding case no. 1/2 023. order dated 29/12/2023 | In view of facts, provision and documents provided on record, the contract period is subsistence for seven years from the date of issue of letter of acceptance and hence the application is allowed. The contract period of the claimant shall be extended for subsequent operating year as per the provisions of contract agreement. |

वरीलप्रमाणे न्यायालयीन प्रक्रिया व आवश्यकतेनुसार सदर कामास खालीलप्रमाणे मुदत वाढ देण्यात आली असून त्याचा कारणांसह तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| मुदतवाढ क्र. | ठराव | दिनांक | कालावधी |
|---|---|---|---|
| १ | प्रशासकीय ठराव क्र.५७८ | ०८/०३/२०२१ | ६ महिने |
| २ | प्रशासकीय ठराव क्र.५२६ | २७/०८/२०२१ | ६ महिने |
| ३ | प्रशासकीय ठराव क्र. ०२ | ०६/०४/२०२२ | १ महिने |
| ४ | प्रशासकीय ठराव क्र.७५ | २२/०४/२०२२ | १ वर्ष |
| ५ | प्रशासकीय ठराव क्र.३०४२ | ३१/०३/२०२३ | ०१/०४/२०२३ ते ३०/०६/२०२३ (३ महिने) |
| ६ | प्रशासकीय ठराव क्र.११७० | ३१/०७/२०२३ | ०१/०७/२०२३ ते ३०/०९/२०२३ (३ महिने) |
| ७ | प्रशासकीय ठराव क्र.१७७८ | २७/०९/२०२३ | ०१/१०/२०२३ ते ३१/१२/२०२३ (३ महिने) |
| ८ | प्रशासकीय ठराव क्र.२८६४ | २५/०१/२०२४ | ०१/०१/२०२४ ते ३१/१२/२०२४ (१ वर्ष) |
| ९ | प्रशासकीय ठराव क्र.१९२५ | ३१/१२/२०२४ | ०१/०१/२०२५ ते २८/०२/२०२५ (२ महिना) |
| १० | प्रशासकीय ठराव क्र. २३६० | २८/०२/२०२५ | ०१/०३/२०२५ ते ३१/०३/२०२५ (१ महिना) |
| ११ | प्रशासकीय ठराव क्र. २५९२ | २७/०३/२०२५ | ०१/०४/२०२५ ते ३०/०४/२०२५ (१ महिना) |

सदर ठेक्याच्या कालावधी वर नमुद तक्त्यातील अनु. क्र. ८ नुसार दि.३१/१२/२०२४ रोजी संपुष्टात येत असल्याने नवीन ई-निविदा जाहिर करणे आवश्यक होते. त्याअनुषंगाने वसई विरार शहर महानगरपालिकेने प्रशासकीय ठराव क्र. १३३२ दि.०९/१०/२०२४ अन्वये सन २०२४-२५, सन २०२५-२६, सन २०२६-२७ ही त्रैवार्षिक निविदा दि.११/१०/२०२४ रोजी जाहीर करण्यात आलेली निविदा प्रशासकीय ठराव क्र. १२९, दि. २३/०४/२०२५ अन्वये रद्द करुन नविन निविदा जाहिर करणेबाबत मान्यता देण्यात आलेली आहे. तथापि, नविन निविदा प्रक्रिया करुन कार्यादेश देणेकामी २ महिन्यांचा कालावधी आवश्यक आहे.

तसेच दैनंदिन साफसफाई हा अत्यावश्यक सेवेचा भाग असून सदर कामामध्ये खंड पाडणे नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीने हितावह नाही. त्यामुळे सद्यस्थितीत चालू असलेल्या कामास २ महिन्याची मुदतवाढ (जून

अखेरपर्यंत) देणे आवश्यक आहे. याबाबत २ महिन्याची मुदतवाढ (जून अखेरपर्यंत) गृहित धरून याकामी येणारा अंदाजित खर्च खालील प्रमाणे गृहीत धरण्यात आलेला आहे.

**<u>प्रस्तावित २ महिन्यांची मुदतवाढ :-</u>**

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | प्रभाग समिती | झोन क्र. | मासिक खर्च (मार्च २०२५) | २ महिन्यांसाठी होणारा खर्च (रू) |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. अनंत इंटरप्रायजेस | A | १ | १,६२,६६,२७०/- | ३,२५,३२,५४०/- |
| २ | उजाला लेबर कॉन्ट्रॅक्टर | B | २ | १,१७,९१,१९७/- | २,३५,८२,३९४/- |
| ३ | साई गणेश इंटरप्रायजेस | | ३ | १,५१,२६,३६०/- | ३,०२,५२,७२०/- |
| ४ | रेन्बो इंटरप्रायजेस | C | ४ | ४९,२५,९१२/- | ९८,५१,८२४/- |
| ५ | श्री. अनंत इंटरप्रायजेस | | ५ | ९७,८८,५८१/- | १,९५,७७,१६२/- |
| ६ | दिनंश बी. संखे | D | ६ | ७०,९६,८१४/- | १,४१,९३,६२८/- |
| ७ | रिलायबल एजन्सी | | ७ | ४८,५३,१७७/- | ९७,०६,३५४/- |
| ८ | हेना इंटरप्रायजेस | | ८ | १,१०,५१,१२०/- | २,२१,०२,२४०/- |
| ९ | श्री. अनंत इंटरप्रायजेस | E | ९ | १,२०,८४,८०७/- | २,४१,६९,६१४/- |
| १० | साई गणेश इंटरप्रायजेस | | १० | ६६,१८,९१३/- | १,३२,३७,८२६/- |
| ११ | हेना इंटरप्रायजेस | F | ११ | ५०,२५,९०४/- | १,००,५१,८०८/- |
| १२ | उजाला लेबर कॉन्ट्रॅक्टर | | १२ | ६९,७६,७१०/- | १,३९,५३,४२०/- |
| १३ | उजाला लेबर कॉन्ट्रॅक्टर | | १३ | ७०,१७,४०६/- | १,४०,३४,८१२/- |
| १४ | रिलायबल एजन्सी | G | १४ | ४१,५०,८९७/- | ८३,०१,७९४/- |
| १५ | शिवम इंटरप्रायजेस | | १५ | ६४,२१,२२५/- | १,२८,४२,४५०/- |
| १६ | साई गणेश इंटरप्रायजेस | | १६ | ५६,४१,८८०/- | १,१२,८३,७६०/- |
| १७ | रिलायबल एजन्सी | H | १७ | २,०१,६०,९२९/- | ४,०३,२१,८५८/- |
| १८ | मनदीप इंटरप्रायजेस | I | १८ | ८६,१४,३३६/- | १,७२,२८,६७२/- |
| १९ | आर.बी.इन्फ्रा.प्रो.लि. | | १९ | ५६,९२,०८१/- | १,१३,८४,१६२/- |
| २० | दिनेश बी. संखे | | २० | ४०,२२,९४८/- | ८०,४५,८९६/- |
| **एकुण** | | | | **१७,३३,२७,४६७/-** | **३४,६६,५४,९३४/-** |

वरीलप्रमाणे कामगारांच्या किमान वेतनात डी. ए. मध्ये वाढ होत असते, त्याप्रमाणे संभावित खर्चात वाढ होऊ शकते त्याअनुषंगाने सदर वाढ देय राहील.

तरी, रस्ते सफाई, गटार सफाई, कचरा संकलन करून क्षेपणभूमीवर वाहतुक करणे या कामासाठी नेमणुक केलेल्या अभिकर्त्यांना २ महिन्याची मुदतवाढ दिल्यास अंदाजित रक्कम रू. ३४,६६,५४,९३४/- (अक्षरी- चौतीस कोटी सहासष्ट लक्ष चोपन्न हजार नऊशे चौतीस मात्र) इतका खर्च होऊ शकतो.

सदरचा खर्च सन २०२५-२६ या वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पातील घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत अनुदानासह, रस्ता, गटारे, नाले, सार्वजनिक ठिकाणे इ. साफसफाईसाठी घंटागाडी, यांत्रीक झाडू उपलब्ध करणेसह सफाई ठेका व भाड्याच्या वाहनाद्वारे यांत्रिक पद्धतीने नालेसफाई या लेखाशिर्षातील प्रस्तावीत तरतुद रक्कम रू.३५० कोटी मधून भागविणे शक्य आहे.

तरी, दि. ०१ मे २०२५ ते ३० जून २०२५ पर्यंत अथवा नविन निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन कार्यादेश देणेपर्यंत मुदतवाढ देऊन होणाऱ्या अंदाजित रक्कम रू. ३४,६६,५४,९३४/-(अक्षरी- चौतीस कोटी सहासष्ट लक्ष चोपन्न हजार नऊशे चौतीस मात्र) होणाऱ्या संभावित खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकामी घनकचरा व्यवस्थापन विभागाने शिफारस केली आहे, त्यानुसार पुढीलप्रमाणे ठराव करण्यात येत आहे.

**ठराव निर्णय :-** नागरी घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत दैनंदिन रस्ते सफाई, गटार सफाई, कचरा संकलन करून क्षेपणभूमीवर वाहतुक करणेसाठीच्या त्रैवार्षिक निविदेस दि.०१ मे २०२५ ते ३० जून २०२५ पर्यंत मुदतवाढ देऊन होणाऱ्या अंदाजित रक्कम रू. ३४,६६,५४,९३४/-(अक्षरी- चौतीस कोटी सहासष्ट लक्ष चोपन्न हजार नऊशे चौतीस मात्र) इतक्या होणाऱ्या संभावित खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेत येत आहे.

२८/०५

**अनिलकुमार पवार** (भा.प्र.से.)
**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्यकार्यालय, विरार पश्चिम, जि- पालघर पिन नं. 401 303
दूरध्वनी – 0250 -2525101/02/03/04/05/06, फॅक्स्- 0250- 2525107.
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

T/७३

विभाग : वृक्षप्राधिकरण/उद्यान

प्रशासकीय ठराव क्र. ७५८

दिनांक : २८/०४/२०२५

**कामाचे नाव :- पूर्व पावसाळी तसेच पावसाळयाच्या दिवसांत धोकादायक वृक्षकापणी, वृक्षांच्या धोकादायक फांदयाची छाटणी/कापणी करिता अशासकिय संस्थेची /ठेकेदारांची २ वर्षाकरिता नेमणूक करणे.**

| | | |
|---|---|---|
| अंदाजपत्रकिय रक्कम | :- | रु.८०,००,०००/- |
| प्रशासकिय मंजुरी आदेश | :- | मा.प्रशासकिय ठराव क्र. २१९० दि.०३/०२/२०२५ |
| तांत्रिक मान्यता | :- | बी-२ निविदा |
| ई- टेंडरिंग द्वारे निविदा प्रसिध्दी | :- | व.वि.श.म./वृक्षप्राधि/१७१८/२०२५ दि.०७/०२/२०२५ |
| वृत्तपत्रातील ई-निविदा सूचना प्रसिध्दी दिनांक | :- | दि. ०८/०२/२०२५ |
| वृत्तपत्राचे नाव व पृष्ठ क्रमांक | :- | १) दै.सकाळ २) दै.प्रहार ३) दै.ग्लोबल टाईम्स ४) दै.जागल्या ५) दै.परशुराम समाचार |
| ई- टेंडरिंग द्वारे निविदा प्रिपरेशनची दिनांक | :- | दि.०८/०२/२०२५ पासून ते दि.२२/०२/२०२५ पर्यत रोजी दु.३.०० वा. पर्यत |
| ई- टेंडरिंग द्वारे निविदा स्विकारण्याची दिनांक | :- | दि.२२/०२/२०२५ रोजी दु.३.०० वा. पर्यत |
| विहीत मुदतीत ऑन लाईन प्रकियेद्वारे प्राप्त निविदा | :- | ०४ |
| ई- टेंडरिंग द्वारे निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा ) | :- | दि.२५/०२/२०२५ |
| ई- टेंडरिंग द्वारे निविदा उघडण्याची दिनांक (द्वितीय लखोटा ) | :- | दि.२७/०३/२०२५ |
| प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी | :- | अतिरिक्त आयुक्त |

प्राप्त निविदाचा तुलनात्मक तत्क्ता खालील प्रमाणे:-

T/04

| SR. NO. | Description of work | Unit | Market Rate (lowest rate) | Baba construction | Aesthetic Landscaping | Kedarnath Construction | वाटाघाटी अंती प्राप्त निम्नत्तम दर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Trimming of trees below 2 feet girth | Nos | 2000.00 | 2145.24 (L1) | 2360.00 | 2478.00 | 2099.80 |
| 2 | Trimming of trees having girth between 2 feet to 5 feet | Nos | 3000.00 | 3217.86 (L1) | 3498.70 | 3658.00 | 3149.70 |
| 3 | Trimming of trees below 5 feet girth | Nos | 4000.00 | 4290.48 | 4200.80 (L1) | 6726.00 | 4200.80 |
| 4 | Removal of dead trees having girth between 2 feet to 5 feet | Nos | 7000.00 | 7508.34 | 7257.00 (L1) | 8378.00 | 7257.00 |
| 5 | Removal of easiy accessible fallen/Dangerous teers having girth between 2 feet to 5 feet | Nos | 10000.00 | 10726.20 | 10266.00 (L1) | 11918.00 | 10266.00 |
| 6 | Removal of fruit & fronts of palm trees having height above 25 feet | Nos | 4000.00 | 4290.48 | 2950.00 (L1) | 4838.00 | 2950.00 |
| 7 | Disposal of Trimmed material such as branches, trunks of trees & other residues of trees by picking with vehicles like truck upto the distance of 20km | Nos | 7500.00 | 8045.24 (L1) | 8496.00 | 11800.00 | 7874.25 |
| 8 | Disposal of trimmed material such as branches, trunks of trees & other residues of trees by picking with vehicles like Tractor upto the distance of 20km | Nos | 7500.00 | 8045.24 (L1) | 8496.00 | 9440.00 | 7874.25 |

उपरोक्त निविदांची तुलना करता मे.बाबा कंन्स्ट्रक्श यांचे अनु.क्र.१,२,७ व ८ मधील बाबीचे दर हे सर्वात कमी आहेत. तसेच मे.ॲस्थेटिक लॅण्डस्केपिंग यांचे अनु. क्र. ३,४,५ व ६ मधील बाबीचे दर सर्वात कमी असल्याने सदर निविदेतील प्राप्त दरानुसार निम्नत्तम देकराचे निविदाकार मे.ॲस्थेटिक लॅण्डस्केपिंग यांना जा.क्र.व.वि.श.म./वृक्ष प्रा./०८/२५-२६ दि.०१/०४/२०२५ व मे.बाबा कंन्स्ट्रक्शन यांना जा.क्र.व.वि.श.म./वृक्ष प्रा./०९/२५-२६ दि.०१/०४/२०२५ अन्वये वाटाघाटी करणे कामी पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्यानुसार मे.ॲस्थेटिक लॅण्डस्केपिंग यांनी आवक्र. ३६ दि.०४/०४/२०२५ अन्वये निविदेमध्ये भरलेले दर हे (०२) दोन वर्षाकरिता असल्याने सदर दर कामाच्या विविध आर्थिक बाबी विचारात घेऊन भरणा करण्यात आलेले असून सदर दरामध्ये कोणतीही कपात

करणे शक्य नसल्याचे कळविले आहे तसेच मे.बाबा कंन्स्ट्रक्शन आवक क्र. ३७ दि.०४/०४/२०२५ अन्वये अ.क्र.१,२,७ व ८ मधील दर वाटाघाटी अंती कमी करुन दिलेले आहेत. निविदा पुस्तिकेतील अट क्र. २० व २१ नुसार सदर कामाकरिता L१ निविदाधारकाच्या दरावर समान दरानुसार तिन्ही पात्र निविदाधारकांची पॅनलवर नियुक्ती करणे आवश्यक आहे. त्यानुसार, मे.अॅस्थेटिक लॅण्डस्केपिंग, मे.बाबा कन्स्ट्रक्शन व मे.केदारनाथ कन्स्ट्रक्शन या तीनही निविदाधारकांना L१ दरावर काम करण्यास सहमती दर्शविण्याबाबत पत्र देण्यात आले होते. त्या अनुषंगाने, दिनांक ११/०४/२०२५ रोजी वरील तिन्ही निविदाधारकांनी लेखी स्वरूपात वाटाघाटीनंतर प्राप्त L१ दरावर काम करण्यास सहमती दर्शविली आहे.

दि. १७/ ०४ /२०२५ रोजी झालेल्या निविदा सभेमध्ये यासंबंधी सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानुसार, निविदा पुस्तिकेतील अट क्र. २० व २१ अन्वये मे.अॅस्थेटिक लॅण्डस्केपिंग, मे.बाबा कन्स्ट्रक्शन व मे.केदारनाथ कन्स्ट्रक्शन यांना समान दरावर पॅनलवर नियुक्त करणे व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार वाटाघाटीनंतर प्राप्त दरावर त्यांच्याशी संविदा करणे उचित असल्याबाबत शिफारस करण्यात येत आहे. वरीलप्रमाणे, मे.अॅस्थेटिक लॅण्डस्केपिंग, मे.बाबा कन्स्ट्रक्शन व मे.केदारनाथ कन्स्ट्रक्शन यांच्याशी वाटाघाटीनंतर प्राप्त दरावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.आयुक्त तथा प्रशासक यांचेकडे सविनय सादर.

| अ.क्र. | बाब | अपेक्षित दिनांक |
|---|---|---|
| १ | प्रशासकिय व वित्तीय मान्यता ठराव | दि.०३/०२/२०२५ |
| २ | निविदा प्रसिध्द करणे | दि.०७/०२/२०२५ |
| ३ | प्रथम लिफाफा उघडणे | दि.२५/०२/२०२५ |
| ४ | द्वितीय लिफाफा उघडणे | दि.२७/०३/२०२५ |
| ५ | संविदा मंजुरी ठराव | दि.२५/०४/२०२५ |
| ६ | कार्यादेश देणे/करारनामा करणे | दि.२९/०४/२०२५ |
| ७ | काम सुरु करणे | दि.३०/०४/२०२५ |
| ८ | काम पूर्ण करणे | २ वर्षे कालावधी |
| ९ | देयक सादर करणे | टप्या- टप्प्याने |

| | | |
|---|---|---|
| १० | दकाचे प्रदान करणे | देयक प्राप्तीनंतर १० दिवसांत |
| ११ | उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे | -- |
| १२ | इतर | -- |

**ठराव निर्णय :**

| अ.क्र. | बाब | अपेक्षित दिनांक |
|---|---|---|
| १ | प्रशासकिय व वित्तीय मान्यता ठराव | दि.०३/०२/२०२५ |
| २ | निविदा प्रसिध्द करणे | दि.०७/०२/२०२५ |
| ३ | प्रथम लिफाफा उघडणे | दि.२५/०२/२०२५ |
| ४ | द्वितीय लिफाफा उघडणे | दि.२७/०३/२०२५ |
| ५ | संविदा मंजुरी ठराव | दि.२५/०४/२०२५ |
| ६ | कार्यादेश देणे/करारनामा करणे | दि.२९/०४/२०२५ |
| ७ | काम सुरु करणे | दि.३०/०४/२०२५ |
| ८ | काम पूर्ण करणे | २ वर्षे कालावधी |
| ९ | देयक सादर करणे | टप्या- टप्प्याने |
| १० | देयकाचे प्रदान करणे | देयक प्राप्तीनंतर १० दिवसांत |
| ११ | उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे | -- |
| १२ | इतर | -- |

T/59

सदर निविदेतील वाटाघाटी अंती प्राप्त निम्नत्तम दरानूसार मे.ॲस्थेटिक लॅण्डस्केपिंग, मे.बाबा कन्स्ट्रक्शन व मे.केदारनाथ कन्स्ट्रक्शन यांची पॅनलवर नियुक्ती करणेस तसेच त्यांच्याशी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेस मान्यता देण्यात येत आहे.

पूर्व पावसाळी तसेच पावसाळयाच्या दिवसांत धोकादायक वृक्षकापणी, वृक्षांच्या धोकादायक फांदयाची छाटणी/कापणी करिता मे.ॲस्थेटिक लॅण्डस्केपिंग, मे.बाबा कन्स्ट्रक्शन व मे.केदारनाथ कन्स्ट्रक्शन यांचेबरोबर कामाच्या व्याप्तीनुसार अटी शर्तीयुक्त करारनामा करुन कार्यादेश देण्यात यावा.

सदर कामाकरिता वरील नमुद केलेल्या कालमर्यादा पाळल्या न गेल्यास विभाग प्रमुख व त्यांचे अधिनस्त कर्मचारी MCSR १९७९ प्रमाणे कार्यवाहीस पात्र राहतील. तसेच सदर कामामध्ये काही अपरिहार्य कारणास्तव (तांत्रिक, नैसर्गिक व इतर सबब कारणास्तव) विलंब झाल्यास त्या त्या वेळी विलंबास सक्षम प्राधिका-याची मंजुरी घेणे बंधनकारक असेल. तसेच इस्टीमेट मधील प्रत्येक टप्प्यावर केलेल्या कामाचे Geotagged फोटोग्राफ्स सादर करणेंत यावे. तद्नंतरच कामाची रक्कम अदा करणेत यावी.

28/04

अनिलकुमार पवार (भा.प्र.से)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (प.), जि. - पालघर, पिन नं. 401 303
दुरध्वनी - 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स - 0250-2525107,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र.** 160

विभाग :- पाणी पुरवठा
दिनांक :-28/04/2025

---

**प्रस्तावाचा विषय** :- वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "जी" अंतर्गत वॉर्ड क्र. १०५ मधील जुचंद्र कार्यालया जवळील जुना उंच जलकुंभ तोडून २,००,००० लिटर क्षमतेचा उंच जलकुंभ बांधणे कामी येणाऱ्या खर्चास सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर** :-

वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "जी" अंतर्गत वॉर्ड क्र. १०५ मधील जुचंद्र कार्यालया जवळील जुना उंच जलकुंभ निष्कासीत करून त्या ठिकाणी २,००,००० लिटर क्षमतेचा उंच जलकुंभ उभारणे कामाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| अंदाजपत्रकीय रक्कम | :- | रु.७३,४६,०२९/- (GST सह) |
| प्रशासकीय मान्यता | :- | प्रशासकीय ठराव क्र.११८० दि.०१/०८/२०२३ |
| तांत्रिक मान्यता | :- | कार्यकारी अभियंता, दि.०१/०८/२०२३ |
| निविदा किंमत | :- | रु.६२,२५,४४८/- (GST वगळून) |
| ई टेंडरींग द्वारे निविदा सुचना प्रसिद्ध | :- | जा.क्र. वविशम/शअ/३८४/२०२३, दि. ०२/०८/२०२३ |
| वृत्तपत्रातील जाहिर निविदा ई टेंडरींग द्वारे निविदा प्रसिद्धी | :- | दै. हिंदुस्तान टाईम्स, दै. मिड - डे, दै. सकाळ, दै. प्रहार दि. ०४/०८/२०२३ |
| ई टेंडरींग द्वारे निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा) | :- | दि. १७/०८/२०२३ |
| विहीत मुदती ऑनलाईन प्रक्रियेद्वार प्राप्त निविदा | :- | ०३ |
| प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी | :- | प्र. कार्यकारी अभियंता |
| ई - टेंडरींग द्वारे निविदा उघडण्याची दिनांक ( व्दितीय लखोटा) | :- | दि.२४/११/२०२३ |
| विहीत मुदतीत ऑनलाईन प्रक्रियेद्वारे पात्र निविदाकार | :- | ०३ |
| लघुत्तम दर | :- | वाटाघाटीअंती ८.८५ % जादा |

| | | |
|---|---|---|
| संविदा ठराव | :- | प्रशासकीय ठराव क्र.३२२४<br>दि.१६/०२/२०२४ |
| मंजूर ठेकेदार | :- | मे. नितिन जी. म्हात्रे, नाळे |
| कार्यादेश | :- | जा.क्र. वविशम/पापु/१००९/२०२४<br>दि.०५/०३/२०२४ |

उपरोक्त विषयांकीत कामाचे मंजूर ठेकेदार मे. नितिन जी. म्हात्रे, नाळे यांनी कामास सुरूवात करून अस्तित्वातील जलकुंभ निष्कासीत केला. तद्नंतर जलकुंभ उभारण्या अनुषंगाने पाईलींग पध्दत अंदाजपत्रकात समाविष्ट असल्याने त्यासाठी ट्रायलबोअरचे काम हाती घेतले. अंदाजपत्रकात पाईलींगची कमाल खोली १३ मीटर इतकी घेतली असून प्रत्यक्षात २३ मीटर खोल खडक लागला आहे.

जलकुंभ प्रस्तावित असलेल्या ठिकाणी भूपृष्ठाखालील भाग हा चिखल व खारटनीचा असून त्यास पाईलींग करीता MS पाईपने केसींग करणे आवश्यक आहे. अंदाजपत्रकात पाईल केसींगचे काम समाविष्ट नसल्याने सदरची बाब अतिरिक्त बाब म्हणून समाविष्ट करणे आवश्यक आहे. तसेच ट्रायलबोअरच्या कामाकरीता जादा परिमाण झाले आहे.

ट्रायलबोअर चाचणी अहवाल तसेच जलकुंभाचे डिझाईन ठेकेदाराने तयार केले असून डीझाईनला गव्हर्नमेंट कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, जळगांव यांचेकडून मान्यता घेऊन दि.०८/१०/२०२४ रोजीच्या पत्रान्वये महापालिकेस सादर केले आहे. सदर पत्रात पाईल केसींग कामी अतिरिक्त बाब मंजूर करण्यास तसेच ट्रायलबोअरच्या कामात झालेल्या परिमाणाच्या वाढीनुसार खर्चास मान्यता देण्याकामी विनंती केली आहे.

विभागाचे अभिप्राय

१. मे. नितिन जी. म्हात्रे, नाळे यांनी दिलेल्या कार्यादेशानुसार अस्तित्वातील १.४० लक्ष लिटर क्षमतेचा उंच जलकुंभ निष्कासीत करण्याची कार्यवाही पुर्ण केली आहे.
२. अंदाजपत्रकात समाविष्ट ट्रायलबोअरच्या प्रस्तावित कामानुसार कार्यवाही सुरू केली असता २० ते २३ मीटर पर्यंत खोल ट्रायलबोअरचे काम झाल्यानंतर कठिण खडक लागला आहे.
३. अंदाजपत्रकात पाईलींग करीता खोली कमाल १३ मीटर इतकी समाविष्ट आहे. परीणामी सदर बाबीच्या परिमाणात २५% हून अधिक वाढ झाली आहे.
४. जुचंद्र येथील प्रस्तावित जलकुंभाचा भाग हा खारटन क्षेत्र असून स्लरी लॅण्ड असल्याने पाईल फाऊंडेशनला धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब पाईलींगला MS casing करणे आवश्यक आहे. सदरची बाब अतिरिक्त बाब म्हणून सुधारीत अंदाजपत्रकात समाविष्ट करणे आवश्यक आहे.
५. ट्रायलबोअर चाचणी अहवाल तसेच जलकुंभाचे डिझाईन ठेकेदाराने तयार केले असून डीझाईनला गव्हर्नमेंट कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, जळगांव यांचेकडून मान्यता घेतली आहे. सदर डिझाईन मधील बदलामुळे अंदाजपत्रकीय किंमतीत खालील प्रमाणे बदल झाले आहेत.

| अ.क्र. | निविदा तपशील | संभाव्य वाढीची रक्कम |
|---|---|---|
| १ | मुळ निविदेतील समाविष्ट पाईलींगची खोली १३ मीटर वरून २३ मीटर पर्यंत वाढल्याने अंदाजपत्रकात सदर बाबींकरीता गृहित परिमाणात २५% पेक्षा अधिक वाढ झाल्याने | रु. ८९,९५,०२३/- |

| | | |
|---|---|---|
| २ | अतिरिक्त बाब - पाईलींग करीता MS केसींग करणे आवश्यक आहे. | रु. ३३,३९,३२०/- (सन२०२३-२४ च्या चालु दरसूचीनुसार) |

६. ट्रायलबोअरच्या कामाकरीता ठेकेदार यांना जास्त कालावधी लागला तसेच तद्नंतरचा पर्जन्यवृष्टीचा काळ विचारात घेता ठेकेदारास पुढील काम करण्याकरीता माहे जून, २०२५ पर्यंत मुदतवाढ देणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र सार्व. बांधकाम नियम पुस्तिकामधील नियम १३४ ब नुसार एखाद्या कामात फेरबदल करावयाचे असतील अशा प्रकरणी आवश्यक असेल तेथे तपशिलवार पुरक किंवा सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्याची वाट न बघता सक्षम प्राधिकरणाची सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळाली पाहिजे असे निर्देश आहेत. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, कलम १८९ (२ अ) मधील तरतुदीनुसार जुचंद्र भागातील नागरीकांच्या पाणी पुरवठ्याच्या दृष्टीने सदर कामी वरील बाबी अंतर्भुत करून सुधारीत अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक आहे. व मुळ प्रशासकीय किंमतीपेक्षा अधिक खर्च होणार असल्याने त्यास सुधारीत प्रशासकीय मान्यता घेणे क्रमप्राप्त आहे.

वरील जादा परिमाणापोटी वाढ होणाऱ्या बाबींसह पाईल केसींगची अतिरिक्त बाब अंतर्भुत करून विभागाने सदर कामी रु.१,२३,३४,३४३/- किंमतीचे सुधारीत अंदाजपत्रक तयार केले आहे. सदर सुधारीत अंदाजपत्रकानुसार व MS Cassing चे अतिरिक्त बाबीचे काम जलकुंभ उभारणे कामाशी संलग्न असल्याने मंजूर ठेकेदारामार्फत करून घेण्यास मा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेची आवश्यकता असून सद्य:स्थितीत शासनाने महापालिकेवर प्रशासकाची नेमणूक केली आहे. सदरचे अधिकार मा. आयुक्त तथा प्रशासक यांना प्रदान आहेत.

सदरचा खर्च सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पातील "विकासनिधी अंतर्गत मुख्या पाणी पुरवठा योजना जलकुंभ" या लेखाशिर्षावरील उपलब्ध तरतुदीमधून भागश: खर्च भागविणे शक्य असून उर्वरीत खर्च सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय तरतुदीमधून भागविणे शक्य आहे.

तरी वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "जी" अंतर्गत वॉर्ड क्र. १०५ मधील जुचंद्र कार्यालया जवळील जुना उंच जलकुंभ तोडून २,००,००० लिटर क्षमतेचा उंच जलकुंभ बांधणे कामी तयार केलेल्या सुधारीत अंदाजपत्रकीय रु.१,२३,३४,३४३/- खर्चास सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळावी तसेच प्रस्तावात नमुद अतिरिक्त बाबीचे काम मंजूर ठेकेदाराकडून करून घेणेकामी प्रस्ताव मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या मान्यतेकरीता सादर.

---

**ठराव :-**

१. वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "जी" अंतर्गत वॉर्ड क्र. १०५ मधील जुचंद्र कार्यालया जवळील जुना उंच जलकुंभ तोडून २,००,००० लिटर क्षमतेचा उंच जलकुंभ बांधणे कामी रु.७३,४६,०२९/- च्या अंदाजपत्रकीय खर्चास व कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

२. सदर कामी मे. नितिन जी. म्हात्रे, नाळे यांच्या अंदाजपत्रकीय किंमत रु.६२,२५,४४८/- च्या ८.८५% जादा दराच्या निविदेस मान्यता दिली असून प्रशासकीय ठराव क्र.३२२४ दि.१६/०२/२०२४अन्वये संविदा करण्यास व खर्चास मान्यता दिली आहे.

३. मंजूर ठेकेदार मे. नितिन जी. म्हात्रे, नाळे यांनी कामास सुरूवात करून प्रस्तावित जलकुंभाच्या ठिकाणी पाईलींग करीता ट्रायलबोअरचे काम हाती घेतले असता गृहित परिमाणात २५% पेक्षा अधिक वाढ झाली असून परीणामी अन्य बाबींच्या परिमाणात ही वाढ झाली आहे. तसेच सदर भागातील भौगोलीक स्थितीचा अंदाज घेता पाईल MS केसींग करणे आवश्यक असून सदरची बाब अतिरिक्त बाब म्हणून ठेकेदाराकडून करून घेणे आवश्यक आहे.

४. वरील नमुद वस्तुस्थितीचा विचार करता विभागाने तयार केलेल्या रु.१,२३,३४,३४३/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास सुधारीत प्रशासकीय वित्तीय मान्यता देण्यात येत असून प्रस्तावात नमुद प्रमाणे अतिरिक्त बाबीचे काम मंजूर ठेकेदारामार्फत करून घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५. विभागाने प्रस्तावित केल्यानुसार सदर कामास माहे, जून २०२५ अखेर पर्यंत मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

६. वाढीव खर्चानुसार वाढीव मुद्रांक, सुरक्षा अनामत, सुधारीत वीमा प्रमाणपत्र ठेकेदाराकडून घेऊन पुढील कार्यवाही विभागाने करावी.

७. सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पातील संबंधीत लेखाशिर्षावर पुरेशी तरतुद करण्याची जबाबदारी विभागाची राहील.

२४/०४

अनिलकुमार पवार (**भा.प्र.से.**)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय, विरार प, जि- पालघर, पि नं. ४०१३०३**
दुरध्वनी-०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स-०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. - ९६१

विभाग:- माहिती तंत्रज्ञान
दिनांक:- २८/०४/२०२५

प्रस्तावाचा विषय:- वसई विरार शहर महानगरपालिके अंतर्गत मुख्यालयासह प्रभाग समिती, रुग्णालये, नागरी आरोग्य केंद्र, अग्निशमन केंद्र व इतर विभागीय कार्यालयांमध्ये तीन वर्षाकरिता इंटरनेट सुविधा पुरविणेकामी होणाऱ्या खर्चास सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणे बाबत.

प्रस्तावाचा मजकूर:- सादर करण्यात येते की, वसई विरार शहर महानगरपालिकेतील मुख्यालयासह, ९ प्रभाग समिती, ७ रुग्णालये, २१ नागरी आरोग्य केंद्र, २ माता व बाल संगोपन केंद्र व ७ अग्निशमन केंद्र व इतर विभागीय कार्यालये कार्यरत आहेत. सदर कार्यालयामध्ये संगणकाद्वारे माहिती देवाण घेवाण करणेसाठी, ई-मेल द्वारे पत्र पाठविणे, सी.आर.एम, आपले सरकार, प्रधानमंत्री आवास योजना, ई-औषधी संगणक प्रणाली, ई-निविदा, जन्म-मृत्यू नोंद व इतर शासकीय कामे करणेसाठी इंटरनेट सुविधेची आवश्यकता असते.

त्याअनुषंगाने वसई विरार शहर महानगरपालिके अंतर्गत मुख्यालयासह प्रभाग समिती, रुग्णालये, नागरी आरोग्य केंद्र, अग्निशमन केंद्र व इतर विभागीय कार्यालयांमध्ये तीन वर्षाकरिता इंटरनेट सुविधा पुरविणेकामी ई-निविदा प्रक्रियाद्वारे निविदा प्रक्रिया पुर्ण करुन कार्यादेश दिल्या पासून तीन वर्षाकरीता पॅनलवर एजन्सी निश्चित करणे कामी व प्रती वर्ष अंदाजित रक्कम रु. २०,००,३५४/- प्रमाणे तीन वर्षाकरीता रक्कम रु. ६०,०१,०६२/- इतक्या खर्चास मा. प्रशासकीय ठराव क्र. ३५९ दि. २४/०७/२०२४ रोजी अन्वये मंजूरी घेण्यात आलेली होती.

सदर मंजूरीच्या अनुषंगाने https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर निविदा प्रसिद्ध करुन दि. १२/०८/२०२४ ते दि. २०/०८/२०२४ रोजी या कालावधीत निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर कालावधीत एकुण ३ निविदाकार प्राप्त झाले होते. प्राप्त निविदेतील लघुत्तम निविदाकारांचे दर संदर्भिय क्र. २ प्रशासकीय ठराव क्र. १३९८ दि. ११/१०/२०२४ रोजी अन्वये मंजूर करण्यात आले आहेत.

संदर्भ क्र. ३ व ४ अन्वये लघुत्तम निविदाकारांसोबत करारनामा करुन महानगरपालिकेतील मुख्यालयासह प्रभाग समिती, रुग्णालये, नागरी आरोग्य केंद्र, अग्निशमन केंद्र व इतर विभागीय कार्यालयांमध्ये इंटरनेट सुविधा पुरविणेकामी संदर्भ क्र. ५ व ६ अन्वये कार्यादेश देण्यात आलेला आहे.

त्यानुसार मे. इंस्टानेट टेक्नॉलॉजी प्रा. ली व मे. बी.टी.एस टेक्नॉलॉजी प्रा. ली यांनी कार्यादेशात नमुद केलेल्या तपशिलाप्रमाणे इंटरनेट सुविधा पुरविलेली आहे.

संदर्भ पत्र क्र. ७ अन्वये वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी १५ वा वित्त आयोग अंतर्गत मंजूर ३५ आयुष्यमान आरोग्य मंदीर केंद्र व प्रस्तावीत २० आयुष्यमान केंद्र असे एकूण ५५ आयुष्यमान आरोग्य मंदीर केंद्रे व १५ हिंदुह्रदयसम्राट बाळासाहेब आपला दवाखाना येथे इंटरनेट सुविधा मिळणे कामी मागणी केलेली आहे.

मा. वैद्यकीय आरोग्य विभाग यांनी मागणी केलेल्या आयुष्यमान आरोग्य मंदीर केंद्र व हिंदुह्रदयसम्राट बाळासाहेब आपला दवाखाना या केंद्रा अंतर्गत इंटरनेट सुविधा पुरविणे कामी संदर्भ क्र. १ च्या प्रशासकीय ठरावा अन्वये तीन वर्षाकरीता रक्कम रु. ६०,०१,०६२/- इतक्या मंजूरी घेण्यात आलेल्या खर्चात सदरचा खर्च भागविणे शक्य नाही.

त्यामुळे सदर ठिकाणी इंटरनेट सुविधा पुरविणेकामी पृष्ठ क्र.        वर जोडल्याप्रमाणे तीन वर्षाकरीता होणाऱ्या अंदाजित रक्कम रु. १७,२०,७२३/- प्रमाणे रक्कम रु. ७७,२१,७८५/- इतकी सुधारीत मंजूरी मिळणे अपेक्षित आहे. सदरचा खर्च लेखासांकेतांक क्र. ०४४-२४७० "संगणक व्यवस्थापन खर्च" या लेखाशिर्षा अंतर्गत भागवता येईल.

तरी वैद्यकीय आरोग्य विभाग यांनी मागणी केलेल्या आयुष्यमान आरोग्य मंदीर केंद्र व हिंदुह्रदयसम्राट बाळासाहेब आपला दवाखाना येथे इंटनेट सुविधा पुरविणेकामी वसई विरार शहर महानगरपालिके अंतर्गत मुख्यालयासह प्रभाग समिती, रुग्णालये, नागरी आरोग्य केंद्र, अग्निशमन केंद्र व इतर विभागीय कार्यालयांमध्ये तीन वर्षाकरिता इंटरनेट सुविधा पुरविणेकामी घेण्यात आलेल्या मंजूरीस रक्कम रु. ७७,२१,७८५/- इतकी सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस्तव सादर.

**<u>ठराव/निर्णय:-</u>** वसई विरार शहर महानगरपालिके अंतर्गत मुख्यालयासह प्रभाग समिती, रुग्णालये, नागरी आरोग्य केंद्र, अग्निशमन केंद्र व इतर विभागीय कार्यालयांमध्ये तीन वर्षाकरिता इंटरनेट सुविधा पुरविणेकामी मा.प्रशासकीय ठराव क्र.३५९ दि.२४/०७/२०२४ रोजी अन्वये घेण्यात आलेल्या मंजूरीत वैद्यकीय आरोग्य विभाग यांनी मागणी केलेल्या आयुष्यमान आरोग्य मंदीर केंद्र व हिंदुह्रदयसम्राट बाळासाहेब आपला दवाखाना येथे इंटनेट सुविधा पुरविणेकामी होणारा खर्च भागविणे शक्य नसल्याने, सदर ठिकाणी तीन वर्षाकरीता इंटरनेट सुविधा पुरविणेकामी रक्कम रु.१७,२०,७२३/- इतक्या खर्चा प्रमाणे सदर कामी रक्कम रु. ७७,२१,७८५/- इतकी सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

28/04

अनिलकुमार पवार (भा.प्र.से)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

**वसई - विरार शहर महानगरपालिका**
मुख्य कार्यालय विरार (पश्चिम), जि. पालघर, पिन नं. 401303
दुरध्वनी – 2020 – 2525101/02/03/04 05 /06, फॅक्स् – 0250-2525107
ई - मेल vasaivirarcorporation@yahoo.com

**प्रशासकीय ठराव क्र.**162 **विभाग : बांधकाम विभाग**
**दिनांक :**28/04/2025

**विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (डी) मध्ये वॉर्ड क्र. ७०,७९,७८ व ८७ येथील स्लॅब दुरुस्त करणे.**

| | | |
|---|---|---|
| अंदाजपत्रकीय रक्कम | :- | रु. २,५५,९१८/- |
| प्रशासकीय मान्यता | :- | प्रशासकीय मंजुरी ठराव क्र. ८६३ दि. ०५/०९/२०२४ |
| तांत्रिक मान्यता | :- | कार्यकारी अभियंता यांची पु. क्र. D पृष्ठ क्र. ८/४९ दि. ०५/०९/२०२४ |
| ई - टेंडरींग द्वारे निविदा प्रसिध्दी | :- | वविशम/बांध/४३३/२०२४-२५ दि. १९/१२/२०२४ उप आयुक्त, प्रभाग समिती ' डी ' |
| वृत्तपत्रातील निविदा प्रसिध्दी दि. | :- | दि. १९/१२/२०२४ |
| वृत्तपत्राचे नाव | :- | स्थानिक नोटीस बोर्ड |
| ई - टेंण्डरींग द्वारे निविदा प्रिपेरेशनची तारीख | :- | दि. ३०/१२/२०२४ |
| ई - टेंण्डरींग द्वारे निविदा स्विकारण्याची तारीख | :- | दि. ३०/१२/२०२४ |
| ई - टेंण्डरींग द्वारे निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा) | :- | दि. ३०/१२/२०२४ |
| ई - टेंण्डरींग द्वारे निविदा उघडण्याची दिनांक (द्वितीय लखोटा) | :- | दि. ३०/१२/२०२४ |
| प्राप्त निविदांची संख्या | :- | ०३ |
| प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी | :- | उप अभियंता २) प्र. लेखापाल ३) सहाय्यक आयुक्त ४) उप मुख्य लेखा परिक्षक ५) उप आयुक्त |

प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे:-

| अ. क्र. | निविदा धारकाचे नाव | निविदा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा | निविदेचा दर अंदाजपत्रकिय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्युरिटी बाबत धनाकर्ष तपशिल | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | मे. माता जिवदानी कंन्स्ट्रक्शन | (+) ४% जास्त दराने | | |
| २. | मे. साई पोमु कंन्स्ट्रक्शन | (+) ५% जास्त दराने | - | - |
वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वतीने वसई किल्ल्यामध्ये ऐतिहासिक वास्तु व पर्यटनाला चालना देणेसाठी दरवर्षी माहे मे या महिन्यामध्ये वसई विजयोत्सव दिन या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. या कार्यक्रमाच्या माध्यमातून वसई किल्ल्याचा इतिहास व येथील पर्यटन याची माहिती जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहचविण्यास मदत होत आहे, तसेच याठिकाणी पर्यटक संख्येत वाढ होवून येथील संस्कृतीचे जतन व संवर्धन होण्यास देखील मदत होत असून दरवर्षी या कार्यक्रमास भेट देणाऱ्या नागरिकांच्या संख्येत लक्षणीय वाढ होताना दिसत आहे.

यावर्षी बुद्धपोर्णिमा सोमवार दिनांक.१२ मे २०२५ रोजी आहे. त्यामुळे शनिवार १० मे, रविवार ११ मे व कार्यक्रमाचा मुख्य दिवस सोमवार १२ मे २०२५ असा कार्यक्रम कालावधी निश्चित केल्यास मोठ्या संख्येने नागरिक व पर्यटक वसई किल्ल्यात येण्याची शक्यता आहे. याकरिता बौद्धपौर्णिमेचे औचित्य साधून वसई विजयोत्सव दिन या कार्यक्रमाचे आयोजन सलग तीन दिवसांचे म्हणजेच (दिनांक. १० मे, २०२५ ते १२ मे,२०२५) या कालावधीत आयोजित करणे शक्य होणार आहे.

वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत २८७ वा वसई विजयोत्सव दिन कार्यक्रमाच्या आयोजनाकामी खालील बाबींबर खर्च होणार आहे.

८. किल्ला बांधणी स्पर्धा व त्यांची पारितोषिके,चित्र प्रदर्शन,श्री.वज्रेश्वरी मंदिर ते वसई किल्ला मशाल, वाहन रॅली,शोभायात्रा, पारंपारिक खाद्य पदार्थ जत्रा, पाहुणे कलाकार, व्याख्याते, परिक्षक,कलाकार यांना निवास व्यवस्था आणि मानधन, मशाल यात्रा व शोभा यात्रेत सहभागी होणारी मंडळे,रथ सजावट,मशाल, रांगोळी कलाकार यांचे मानधन, चित्ररथ वाहन भाडे, शाल, श्रीफळ, गुच्छ-हार,फटाके, ढोल ताशा वादक मानधन,किल्ला सफर मानधन,सूत्रसंचालन मानधन,स्वयंसेवक मानधन,विविध स्पर्धा आयोजन व पारितोषिक, शस्त्र व इतर आवश्यक व अनिवार्य असलेला अनुषंगीक खर्च.
९. हॅन्डबील,निमंत्रण पत्रिका, प्रशस्ती पत्रक, बॅनर्स,बॅच, स्टिकर्स/पोस्टर्स, माहितीपत्रक छपाई, इव्हेन्ट टी-शर्ट, टोपी, स्मृती चिन्हे,जाहिरात, रेल्वे जाहिरात, रेडिओ / एफएम जाहिरात व प्रसिद्धी व इतर आवश्यक व अनिवार्य असलेला अनुषंगीक खर्च.
१०. मंडप/स्टेज व्यवस्था,कमानी/ फ्लाईंग साऊंड सिस्टीम,विद्युत रोषणाई, आसन व्यवस्था, बॅरेकेडिंग,फोटोग्राफी, व्हिडिओ चित्रिकरण,जीमी झीप कॅमेरा शुटींग, मोठी स्क्रीन, पीपल काऊंन्टीग डिवाइस, सेक्युरिटी व इतर अनुषंगीक बाबी, कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण व इतर आवश्यक व अनिवार्य असलेला अनुषंगीक खर्च.
११. वाहनभाडे, रहिवास भाडे व इतर आवश्यक व अनिवार्य असलेला अनुषंगीक खर्च.
१२. चहापान/सिलबंद पाणी, निवास व भोजन व्यवस्था तसेच इतर आवश्यक व अनिवार्य असलेला अनुषंगीक खर्च.
१३. ऐतिहासिक व दुर्मिळ वस्तू संग्रहाचे प्रदर्शन, अन्य प्रदर्शने व अनिवार्य असलेला अनुषंगीक खर्च.
१४. तीन दिवस सांस्कृतीक व करमणुकीचे कार्यक्रम, बालजत्रा,लेझर शो,मर्दानी खेळ तसेच इतर आवश्यक व अनिवार्य असलेला अनुषंगीक खर्च.

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात आयोजित केलेल्या वसई विजय दिन (**तीन दिवस**) कार्यक्रमासाठी मा.प्रशासकीय ठराव क्र.३० दि.१९/०४/२०२३ अन्वये रक्कम रुपये १,३३,०३,३५९ /- इतक्या खर्चास मान्यता घेण्यात आली होती. सदर मान्यतेच्या अधिन राहून प्रत्यक्ष रुपये १,२८,२५,१३३/- इतका खर्च झालेला आहे. तर सन २०२४-२५ या वित्तीय वर्षाकरिता चार दिवस कार्यक्रम आयोजित करणेकामी एकुण रुपये १,८१,१२,०००/- या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता घेण्यात आली होती. तथापि कार्यक्रम कालावधीत लोकसभा आदर्श आचार संहिता लागु असल्याने मोठ्या स्तरावर कार्यक्रम न होता फक्त प्रथेप्रमाणे श्री वज्रेश्वरी देवी मंदिर ते वसई किल्ला मशाल बाईक रॅली, पारनाका ते वसई किल्ला मिरवणूक, स्मारकास फुलाची सजावट, विद्युत रोषणाई, साहित्य व इतर अनुषंगीक बाबी याकरिता रुपये १३,३६,५४६/- इतका खर्च झालेला आहे.

सन २०२५-२६ या वित्तीय वर्षात आयोजित कार्यक्रम हा सलग तीन दिवसांचा असून यामध्ये सांस्कृतीक कार्यक्रम, खानपान, मंडप व्यवस्था, ऐतिहासिक व दुर्मिळ वस्तू संग्रहाचे प्रदर्शन व अनिवार्य असलेला बाबी वरील इतर अनुषंगीक खर्चामध्ये नैसर्गिक व बाजार भावातील वाढ लक्षात घेता या वर्षी नियोजित २८७ वा वसई विजयोत्सव दिन (**सलग तीन दिवस**) कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करणेस अंदाजित एकुण रक्कम रुपये १,४१,३०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात सत्कार व इतर समारंभ व्याख्यानमाला, वकृत्वस्पर्धा, ग्रंथ संमेलन, गुणवंत शिक्षक सत्कार, व्यक्ती/संस्थासाठी महानगरपालिका भुषण पुरस्कार, महापौर चषक स्पर्धा व इतर सांस्कृतिक कार्यक्रम आणि क्रीडा कार्यक्रम या लेखाशिर्षा अंतर्गत रक्कम रुपये १८ कोटी इतकी तरतूद केली असून सदरचा खर्च नमुद लेखाशिर्षामधून भागविणे शक्य आहे. तसेच या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६६ मधील पोटकलम ९ अन्वये तरतूद आहे.

प्रस्तावात नमुद बाब क्र.१ ते ५ याकामी वार्षीक दर मंजुर असलेल्या निविदाकारांमार्फत कार्यादेश देवून सदरील कामे करुन घेणेस तसेच ज्या कामांकरिता वार्षिक दर मंजुर नाहीत अशा कामांकरिता दरपत्रके / ई-निविदा मागविणे व कामाची देयके प्रदान करणेंस मंजुरी आवश्यक आहे. त्याचबरोबर तपशीलामधील काही बांबीवर खर्च होणारी रक्कम ही रोखीने अग्रीम घेवून द्यावी लागणार असल्याने सदर कामी होणारी रक्कम अग्रीम स्वरुपात मिळणेंस मंजुरी आवश्यक आहे.

बाब क्र.६ व ७ मधील सांस्कृतीक व करमणुकीचे कार्यक्रमासाठी ई-निविदा व दरपत्रके मागविणे शक्य नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमा मधील प्रकरण ५ संविदा मधील कलम २ (२) मधील तरतुदीनुसार निविदा न मागविता किंवा मागविल्यानंतर त्याचे कडिल ज्या कोणत्याही निविदा येतील त्या न स्विकारता संविदा करण्यास प्राधिकृत करता येणे बाबत तरतुद आहे.

त्यास अनुलक्षुन संदर्भ क्र. ४ ते १३ मधील प्राप्त दरपत्रकांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | संदर्भ क्र. | दरपत्रक धारकाचे नाव | कार्यक्रमाचा तपशील | दरपत्रकातील रक्कम / मानधन |
|---|---|---|---|---|
| १ | ४ | किल्ले वसई मोहिम परिवार प्रमुख श्री. श्रीदत्त नंदकुमार राऊत | शस्त्रात्रे प्रदर्शन, शिवराई प्रदर्शन, लाकडी तोफा प्रतिकृतीचे प्रदर्शन कार्यक्रमाचे मानधन (**एकुण तीन दिवस**) | २२८००० |
| २ | ५ | एक संगीत संध्या तर्फे श्री. शशांक कल्याणकर | छत्रपती शिवराय सांस्कृतिक कार्यक्रमाचे मानधन | ७००००० |
| ३ | ६ | विशाल डान्स ग्रुप तर्फे श्री.रोशन प्रदीप घरत | महाराष्ट्र दर्शन सांस्कृतिक कार्यक्रमाचे मानधन | ११०००० |
| ४ | ७ | मे.फन अनलिमिडेट | बालजत्रा करिता पॉपकॉर्न, कँडी, इन्फ्लेटेबल फुटबॉल डार्ट, वेल्को वॉल, मिकी स्लाइड, झिगझॅग स्लाइड, एअरप्लेन राइड, बंगी जंपिंग, ट्रेन, सफारी पार्क, रॉक क्लाइंबिंग, ऑब्स्टॅकल स्लाइड, बंगी रन, एलिमिनेटर, मिकी मिनी मॅस्कॉट, लायन टायगर मॅस्कॉट (**एकुण तीन दिवस**) | ३८३४०० |
| ५ | ८ | आनंदराव पोवार प्राचीन मर्दानी कला प्रशिक्षण संस्था तर्फे वस्ताद पंडित पोवार | शिवकालीन मर्दानी खेळाची प्रात्याक्षिके या कार्यक्रमाचे मानधन | १००००० |

| अ.क्र. | संदर्भ क्र. | दरपत्रक धारकाचे नाव | कार्यक्रमाचा तपशील | दरपत्रकातील रक्कम / मानधन |
|---|---|---|---|---|
| ६ | ९ | आम्ही सारे तर्फे श्री.मनिष सोपारकर | वाद्यप्रदर्शन (८० पेक्षा जास्त दुर्मिळ वाद्य) **(एकुण तीन दिवस)** | १०१००० |
| ७ | १० | सनशाईन इव्हेंट तर्फे श्री.कुलभुषण देसाई | वसईचा रणसंग्राम (लेझर शो (RGB)) | २६५००० |
| ८ | ११ | मे.राजेंद्र केशव वनमाळी | कार्यक्रमाचे आर्टवर्क व प्रमोशन व्हिडिओ | १९०००० |
| ९ | १२ | श्रीम.बेला शेंडे | बेला शेंडे संगीत रजानी लाईव्ह शो कार्यक्रम | ८२६००० |
| १० | १३ | श्री.भगवान भोईर | बेला शेन्डे संगीत रजनी लाईव्ह शो या कार्यक्रमाकरिता संपूर्ण संगीत बॅन्ड, एलईडीस्क्रीन ,साऊंड व लाईट्स पुरवठा | ५००००० |

त्यानुसार वरील तक्ता नुसार अ.क्र.०१ ते अ.क्र.१० चे दर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमा मधील प्रकरण ५ संविदा मधील कलम २ (२) अन्वये मंजुर करुन सर्व संबंधीतांचा करारनामा करुन त्यांना कामाचा कार्यादेश देणेंस व कार्यक्रमाचे होणारे मानधन संबंधीताना कार्यक्रमाच्या दिवशी अदा करणेस मंजुरी आवश्यक आहे.

तरी प्रस्तावात नमुद प्रमाणे शनिवार दिनांक १० मे,२०२५ ते सोमवार दिनांक १२ मे,२०२५ या कालावधीकरिता वसई विरार शहर महानगरपालिका मार्फत वसई चिमाजी अप्पा स्मारक येथे २८७ वा वसई विजयोत्सव दिन कार्यक्रम आयोजित करणेंस व त्याकामी होणा-या अंदाजीत एकुण रक्कम रुपये १,४१,३०,०००/- इतक्या रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.आयुक्त तथा प्रशासक यांचे अंतिम मान्यतेसाठी ठेवणेंस आदेशास्तव सादर.

**ठराव :-** वसई विरार शहर महानगरपालिका मार्फत २८७ वा वसई विजयोत्सव दिनाचे शनिवार दिनांक १० मे,२०२५ ते सोमवार दिनांक १२ मे,२०२५ या कालावधीकरिता आयोजन करणेकामी व आयोजनाकामी येणा-या अंदाजीत एकुण रक्कम रुपये १,४१,३०,०००/- इतक्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

प्रस्तावात नमुद बाब क्र.१ ते ६ याकामी वार्षीक दर मंजुर असलेल्या निविदाकारांमार्फत कार्यादेश देवून सदरील कामे करुन घेणेस तसेच ज्या कामांकरिता वार्षिक दर मंजुर नाहीत अशा कामांकरिता दरपत्रके/ ई-निविदा मागविणे व कामाची देयके प्रदान करणेंस मंजुरी आवश्यक आहे. त्याचबरोबर तपशीलामधील काही बांबीवर खर्च होणारी रक्कम ही रोखीने अग्रीम घेवून द्यावी लागणार असल्याने सदर कामी होणारी रक्कम अग्रीम स्वरुपात देणेंस मान्यता देण्यात येत आहे.

प्रस्तावात नमुद तक्त्यामधील अ.क्र.०१ ते अ.क्र.१० चे दर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमा मधील प्रकरण ५ संविदा मधील कलम २ (२) अन्वये मंजुर करुन सर्व संबंधीतांचा करारनामा करुन त्यांना कामाचा कार्यादेश देणेंस व कार्यक्रमाचे होणारे मानधन संबंधीताना कार्यक्रमाच्या दिवशी अदा करणेस मान्यता देण्यात येत आहे.

२९/०५

अनिलकुमार पवार (भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

**वसई विरार शहर महानगरपालिका**
मुख्य कार्यालय, विरार पश्चिम, जि. पालघर, पिन नं – ४०१३०३
दूरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७
ई-मेल –vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. ९७२

विभाग : बांधकाम
दिनांक :२९/४/२०२५

---

१) प्रस्तावाचा विषय : वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती आय कार्यक्षेत्रातील **वॉर्ड क्र. ११२ मधील वसई गांव येथील सार्व. वाचनालयात अंतर्गत दुरुस्ती करणे** कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

२) अंदाजपत्रकीय रक्कम : रु. २,६७,९३६/-

३) कामाची आवश्यकता : प्रभाग समिती आय कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ११२ मधील वसई गांव येथे सार्व. वाचनालय असुन तेथे विद्यार्थी तसेच नागरीक वाचनालयाचा लाभ घेणेकरीता येत असतात. सदर वाचनालयाचे रंगकाम नादुरुस्त झालेले आहे तसेच जमिनीवरील कारपेट देखील नादुरुस्त झालेले आहे. त्यामुळे तेथे येणाऱ्या नागरीकांची तसेच विद्यार्थ्यांची गैरसोय होत असुन त्याबाबतचे पत्र कार्यालयात दाखल झालेले आहेत. त्यामुळे त्याअनुषंगाने सदर जागेचे प्रत्यक्ष पाहणी करुन अंदाजपत्रक तयार केले आहे.

४) कामाचे स्वरुप : अंतर्गत कामे : कारपेट, रंगकाम
परिमाण : कारपेट – ११४.३ चौ.मी.
रंगकाम – २२३.१३ चौ.मी.

५) यापुर्वी सदर जागेवर झालेल्या कामाचा तपशिल :- यापुर्वी सदर ठिकाणी मागील ३ वर्षात कुठल्याही प्रकारचे काम झालेले नाही.

६) अर्थसंकल्पीय तरतुद : अ) लेखाशिर्ष : प्रभाग समितीच्या स्तरावरील विकास कामासाठी राखीव तरतुद प्रभाग आय

७) स्थावर मालमत्ता नोंदवही क्र. १२८ पृष्ठ क्र. ०६ अ.क्र. ९५२ वर नोंद

सदर कामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेऊन तांत्रिक मान्यता घेणे, ई-निविदा मागवुन निविदा प्रक्रिया करणे, संविदा मंजुरी प्राप्त करणे, लघुत्तम निविदाधारकासोबत करारनामा करुन कार्यादेश देणे, काम सुरु करुन विहित मुदतीत पुर्ण करणे व देयक सादर करणे इ. सर्व प्रक्रिया पुढील नमुद कालमर्यादेत पुर्ण होणे अपेक्षित आहे.

| अ.क्र | बाब | अपेक्षित दिनांक |
| --- | --- | --- |
| १ | प्रशासकीय व वित्तीय मान्यता ठराव | सक्षम प्राधिकाऱ्याकडुन मंजुरी मिळाले नंतर तात्काळ |
| २ | प्र. शहर अभियंता यांची तांत्रिक मंजुरी घेणे. | दि. २५/०४/२०२५ |
| ३ | निविदा प्रसिध्द करणे. | दि. ३०/०४/२०२५ |
| ४ | प्रथम लिफाफा उघडणे. | दि. ०८/०५/२०२५ |
| ५ | द्वितीय लिफाफा उघडणे. | दि. १५/०५/२०२५ |
| ६ | संविदा मंजुरी ठराव. | दि. १९/०५/२०२५ |
| ७ | कार्यादेश देणे/ करारनामा करणे. | दि. २३/०५/२०२५ |
| ८ | काम सुरु करणे. | दि. २६/०५/२०२५ |
| ९ | काम पुर्ण करणे. | दि. २०/०६/२०२५ |
| १० | देयक सादर करणे. | दि. २५/०६/२०२५ |
| ११ | देयकाचे प्रदान करणे. | दि. ३०/०६/२०२५ |

तरी प्रभाग समिती आय कार्यक्षेत्रातील **वॉर्ड क्र. ११२ मधील वसई गांव येथील सार्व. वाचनालयात अंतर्गत दुरुस्ती करणे** कामी बांधकाम विभागामार्फत चालु राज्य दरसुची सन २०२२-२३ नुसार तयार केलेल्या रक्कम रु. २,६७,९३६/- अंदाजपत्रकास मा. आयुक्त तथा प्रशासक हयांची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस प्रस्ताव सविनय सादर.

**ठराव:-** सदर काम खालील नमुद कालावधीत पुर्ण होणे अपेक्षित आहे.

| अ.क्र | बाब | अपेक्षित दिनांक |
| --- | --- | --- |
| १ | प्रशासकीय व वित्तीय मान्यता ठराव | सक्षम प्राधिकाऱ्याकडुन मंजुरी मिळाले नंतर तात्काळ |
| २ | प्र. शहर अभियंता यांची तांत्रिक मंजुरी घेणे. | दि. २५/०४/२०२५ |
| ३ | निविदा प्रसिध्द करणे. | दि. ३०/०४/२०२५ |
| ४ | प्रथम लिफाफा उघडणे. | दि. ०८/०५/२०२५ |
| ५ | द्वितीय लिफाफा उघडणे. | दि. १५/०५/२०२५ |
| ६ | संविदा मंजुरी ठराव. | दि. १९/०५/२०२५ |
| ७ | कार्यादेश देणे/ करारनामा करणे. | दि. २३/०५/२०२५ |
| ८ | काम सुरु करणे. | दि. २६/०५/२०२५ |
| ९ | काम पुर्ण करणे. | दि. २०/०६/२०२५ |
| १० | देयक सादर करणे. | दि. २५/०६/२०२५ |
| ११ | देयकाचे प्रदान करणे. | दि. ३०/०६/२०२५ |

सदर कामाकरीता वरील नमुद केलेल्या कालमर्यादा पाळल्या न गेल्यास संबंधित विभाग प्रमुख व त्यांचे अधिनस्त कर्मचारी MCSR १९७९ प्रमाणे कार्यवाहीस पात्र राहतील तसेच सदर कामामध्ये काही अपरिहार्य कारणास्तव (तांत्रिक, नैसर्गिक व इतर सबब कारणास्तव) विलंब झाल्यास त्या-त्या वेळी विलंबास सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी घेणे बंधनकारक राहील. तरी वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रातील **वॉर्ड क्र. ११२ मधील वसई गांव येथील सार्व. वाचनालयात अंतर्गत दुरुस्ती करणे** कामी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. २,६७,९३६/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देणेत येत आहे. तसेच त्यानुसार सदर कामाच्या अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजुरी घेऊन निविदेची कार्यवाही करणेस व त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देणेत येत आहे. तसेच एस्टीमेट मधील प्रत्येक टप्प्यावर केलेल्या कामाचे Geo Tagged फोटोग्राफ्स सादर करणेत यावे. नंतरच कामाची रक्कम अदा करणेत यावी.

२३|०४

अनिलकुमार पवार (भा.प्र.से)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

**वसई-विरार शहर महानगरपालिका**
**मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि. पालघर, पिन नं.४०१३०५**
दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. १७३

विभाग : बांधकाम
दिनांक : २९/०४/२०२५

**प्रस्तावाचा विषय:-** प्रभाग समिती 'आय' कार्यक्षेत्रातील **वॉर्ड क्र. १११ मधील तामतलाव रेस्ट हाऊस मध्ये रंगकाम व इतर आवश्यक कामे करणे** याकामी प्राप्त निविदापैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणे बाबत.

| | | |
|---|---|---|
| अंदाजपत्रकीय रक्कम | :- | रु. २,७९,२२३/- |
| तांत्रिक मान्यता रक्कम | :- | रु. २,४१,७००/- |
| निविदा रक्कम | :- | रु. २,४१,७००/- |
| प्रशासकीय मान्यता | :- | मा. आयुक्त तथा प्रशासक हयांचा ठ.क्र. ८८६ दि. ०६/०९/२०२४ |
| तांत्रिक मंजुरी | :- | कार्यकारी अभियंता पा.क्र. ०७ अ.क्र.४५ दि. २३/०९/२०२४ |
| निविदा सुचना प्रसिध्दी दिनांक | :- | दि. २५/०९/२०२४ |
| निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा) | :- | दि. ०१/१०/२०२४ |
| प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी | :- | उप अभियंता |
| द्वितीय लखोटा उघडल्याची दिनांक | :- | दि. ०३/१०/२०२४ |

<u>प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे :-</u>

| अ. क्र. | निविदाधारकाचे नाव | निविदा दर | निविदेचा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्युरिटी बाबत धनाकर्ष तपशिल |
|---|---|---|---|
| १. | मे. राजकुमार वि. ठाकुर | अंदाजपत्रकीय दराने | - |
| २. | मे. आर. कॉन इंजि अ‍ॅण्ड कॉंट्रक्टर्स | २.००% जास्त दराने | - |
| ३. | मे. मनिष एम. परब | ३.००% जास्त दराने | - |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचा अभ्यास करता **मे. राजकुमार वि. ठाकुर** यांची **अंदाजपत्रकीय** दराची निविदा प्राप्त झालेली आहे. त्यानुसार सदर निविदांची तुलना केली असता **मे. राजकुमार वि. ठाकुर**.यांच्या निविदेतील अंदाजपत्रकीय दराने हा तुलनात्मक रित्या इतर निविदांच्या तुलनेत कमी व योग्य आहे.

दि. ०८/१० /२०२४ रोजी अन्वये मा. निविदा समितीने **मे. राजकुमार वि. ठाकुर** यांच्या **अंदाजपत्रकीय** दराच्या निविदेच्या मान्यतेसाठी शिफारस केलेली आहे.

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये उपरोक्त कमी दराची निविदा मंजूर करुन **मे. राजकुमार वि. ठाकुर** यांच्या उपरोक्त कामाची संविदा करणेस मान्यता देणेसाठी विषय शिफारशीसह पुढील उचीत निर्णयास्तव सविनय सादर.

या कामी संविदा मंजुरी प्राप्त करणे, लघुत्तम निविदाधारकासोबत करारनामा करुन कार्यादेश देणे, काम सुरु करुन विहीत मुदतीत पुर्ण करणे व देयक सादर करणे इ. सर्व प्रक्रिया पुढील नमुद कालमर्यादेत पुर्ण होणे अपेक्षित आहे.

| अ. क्र. | बाब | अपेक्षित दिनांक |
|---|---|---|
| १ | प्रशासकीय व वित्तीय मान्यता ठराव | मा. आयुक्त तथा प्रशासक हयांचे कडील ठ. क्र. ८८६ दि. ०६/०९/२०२४ |
| २ | कार्यकारी अभियंता यांची तांत्रिक मंजुरी घेणे. | दि. २३/०९/२०२४ |
| ३ | निविदा प्रसिध्द करणे. | दि. २५/०९/२०२४ |
| ४ | प्रथम लिफाफा उघडणे. | दि. ०१/१०/२०२४ |
| ५ | द्वितीय लिफाफा उघडणे. | दि. ०३/१०/२०२४ |
| ६ | संविदा मंजुरी ठराव. | दि. २४/०४/२०२५ |
| ७ | कार्यादेश देणे/ करारनामा करणे. | दि. ३०/०४/२०२५ |
| ८ | काम सुरु करणे. | दि. ०७/०५/२०२५ |
| ९ | काम पुर्ण करणे. | दि. ३०/०५/२०२५ |
| १० | देयक सादर करणे. | दि. ०६/०६/२०२५ |
| ११ | देयकाचे प्रदान करणे. | दि. १३/०६/२०२५ |

**ठराव:-** सदर काम खालील नमुद कालावधीत पुर्ण होणे अपेक्षित आहे.

| अ. क्र. | बाब | अपेक्षित दिनांक |
|---|---|---|
| १ | प्रशासकीय व वित्तीय मान्यता ठराव | मा. आयुक्त तथा प्रशासक हयांचे कडील ठ. क्र. ८८६ दि. ०६/०९/२०२४ |
| २ | कार्यकारी अभियंता यांची तांत्रिक मंजुरी घेणे. | दि. २३/०९/२०२४ |
| ३ | निविदा प्रसिध्द करणे. | दि. २५/०९/२०२४ |
| ४ | प्रथम लिफाफा उघडणे. | दि. ०१/१०/२०२४ |
| ५ | द्वितीय लिफाफा उघडणे. | दि. ०३/१०/२०२४ |
| ६ | संविदा मंजुरी ठराव. | दि. २४/०४/२०२५ |
| ७ | कार्यादेश देणे/ करारनामा करणे. | दि. ३०/०४/२०२५ |
| ८ | काम सुरु करणे. | दि. ०७/०५/२०२५ |
| ९ | काम पुर्ण करणे. | दि. ३०/०५/२०२५ |
| १० | देयक सादर करणे. | दि. ०६/०६/२०२५ |
| ११ | देयकाचे प्रदान करणे. | दि. १३/०६/२०२५ |

सदर कामाकरीता वरील नमुद केलेल्या कालमर्यादा पाळल्या न गेल्यास संबंधित विभाग प्रमुख व त्यांचे अधिनस्त कर्मचारी MCSR १९७९ प्रमाणे कार्यवाहीस पात्र राहतील तसेच सदर कामामध्ये काही अपरिहार्य कारणास्तव (तांत्रिक, नैसर्गिक व इतर सबब कारणास्तव) विलंब झाल्यास त्या-त्या वेळी विलंबास सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी घेणे बंधनकारक राहील. तरी वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रातील **वॉर्ड क्र. १११ मधील तामतलाव रेस्ट हाऊस मध्ये रंगकाम व इतर आवश्यक कामे करणे** कामी सहभागी झालेल्या निविदाधारकापैकी **मे. राजकुमार वि. ठाकुर** हयांची **अंदाजपत्रकीय** दराची निविदा मंजुर करण्यात येत असुन लघुत्तम निविदाधारकासोबत संविदा करणे, २% सुरक्षा अनामत भरणे तसेच करारनामा, कार्यादेश देणे तसेच नामंजुर ठेकेदाराची इसारा रक्कम परत करणे करीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ७३(ड) अन्वये मान्यता देणेत येत आहे. तसेच एस्टीमेट मधील प्रत्येक टप्प्यावर केलेल्या कामाचे Geo Tagged फोटोग्राफ्स सादर करणेत यावे. नंतरच कामाची रक्कम अदा करणेत यावी.

अनिलकुमार पवार (भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पू), जि. पालघर पिन न. ४०१ ३०५
दूरध्वनी - ०२५० - २५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०२-२५२५१०७
ई – मेल - vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र :- ७७४

विभाग : बांधकाम विभाग
दिनांक : २१/०४/२०२५

---

| | | |
|---|---|---|
| **कामाचे नाव** | :- | वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती जी मधील वॉर्ड क्र १०५ मध्ये नायगाव पुर्व, जूचंद्र येथील नायगाव – बापाणे रस्त्यावर ५ ठिकाणी बॉक्स कल्व्हर्ट बांधणे. |
| **अंदाजपत्रकीय रक्कम** | :- | रु.२,९४,२६,११७/- |
| **तांत्रिक मान्यता रक्कम** | :- | रु.२,९४,२६,११७/- |
| **प्रशासकीय मंजूरी** | :- | आयुक्त तथा प्रशासक यांचा ठराव क्र.२२२४ दि. ०५/०२/२०२५ |
| **तांत्रिक मंजूरी** | :- | शहर अभियंता ह्यांच्या कडील दि. ०७/०२/२०२५ |
| **ई-टेण्डरींगव्दारे निविदा प्रसिध्दी** | :- | वविशम / बांध / शअ / ३७९ / २०२५ दि.१७/०२/२०२५ शहर अभियंता, वसई विरार शहर महानगरपालिका |
| **वृत्तपत्रातील निविदा सुचना प्रसिध्दी** | :- | दि.१७/०२/२०२५ |
| **वृत्तपत्राचे नाव व पृष्ठ क्रमांक** | :- | १) दै.लोकसत्ता २) दै. जागरूक टाइम्स ३) दै.भास्कर ४) दै.नवराष्ट्र ५) दै.दइंडियन एक्सप्रेस ६) दै.मिड-डे ७) दै.आमची मुंबई |
| **ई –टेंडरींगद्वारे निविदा उघडण्याची दिनांक(प्रथमल खोटा)** | :- | दि.२८/०२/२०२५ दु.०४:३५ वाजता |
| **विहीत मुदतीत ऑनलाईन प्रक्रियेव्दारे प्राप्त निविदा** | :- | ०६ |
| **प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी** | :- | प्र. शहर अभियंत |
| **ई –टेंडरींगद्वारे निविदा उघडण्याची दिनांक(द्वितीय लखोटा)** | :- | दि. २१/०३/२०२५ दु. ०४.११ वाजता. |
| **विहीत मुदतीत ऑनलाईन प्रक्रियेव्दारे प्राप्त निविदा** | :- | पात्र ०३ (पृष्ठ क्र. ) |

प्राप्त निविदा निविदासमिती पुढे उघडल्या असता त्याचे दर खालील प्रमाणे आहेत.

| **अ . क्र** | **निविदा धारका चेनाव** | **निविदा दर** | **निविदेचा दर अंदाजपत्रकीय दारपेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सेक्यूरिटी बाबत चा धनाकर्षा चा तपशील** |
|---|---|---|---|
| **१** | **मे.हमीद जे शेख** | **१५.७९% जादा दराने (वाटाघाटी अंती ४.९५% जादा दराने)** | - |
| २ | मे. ओमकार कन्स्ट्रक्शन | १७.७९% जादा दराने | - |
| ३ | मे. श्री कॉन | २०.७९% जादा दराने | - |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचा अभ्यास केली असता, **मे.हमीद जे शेख** यांची **१५.७९% जादा** दाराची निविदा ही इतर निवेदांच्या तुलनेत कमी असल्याचे दिसून येते. परंतु सदर दर महानगरपालिकेस जास्त वाटत असल्याने मा. कार्यकारी अभियंता यांनी जा. क्र : व.वि.श.म/बांध/का.अ/१०६९/२०२४-२५ दि.२१/०३/२०२५ अन्वये **मे.हमीद जे शेख** यांना वाटाघाटीने दर कमी करण्याच्या चर्चे साठी निमंत्रण (पृष्ठ क्र. ३०३) केले असून सदर कामाच्या दरा बाबत चर्चा झाले नंतर **मे.हमीद जे शेख** यांनी दि.२७/०३/२०२५ च्या पत्रान्वये (पृष्ठ क्र. ३०३) निविदा दराचे दर सन २०२२-२३ च्या दर सूची नुसार असून सन २०२२-२३ नंतर आज पर्यंत म्हणजेच सन २०२४-२५ पर्यंत नवीन दरसूची लागू झाली नसल्याने सन २०२२-२३ पासून प्रत्येक वर्ष वाढ बघता सदर कामासाठी लागणाऱ्या Material, Steel, RMC यांच्या दारांमद्धे वाढ झाली असल्याने सदरचे काम अंदाजपत्रकीयदरा पेक्षा **४.९५%जादा दराने** करणेची तयारी दर्शविली आहे.

सदरच्या दरास निविदा समितीने **दि.१५/०४/२०२५** रोजी च्या बैठकीत मान्यता दिलेल आहे.

तरी **मे.हमीद जे शेख** यांच्या वाटाघाटी अंती **४.९५% जादा दराने** असलेल्या निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(३) अन्वये संविदा करणे साठी मा. आयुक्त तथा प्रशासक ह्यांच्या मंजुरीस्तव सादर.

या कामी संविदा मंजूरी करणे, लघुत्तम निविदाधारका सोबत करारनामा करून कार्यादेश देणे, काम सुरू करून विहित मुदतीत पूर्ण करणे व देयक सादर करणे इ. सर्व प्रक्रिया पुढील नमूद कालमर्यादेत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

| अ. क्र | बाब | अपेक्षित दिनांक |
|---|---|---|
| १ | प्रशासकीय व वित्तीय मान्यता ठराव | ०५/०२/२०२५ |
| २ | कार्यकारी तथा शहर अभियंता ह्यांची तांत्रिक मंजूरी घेणे | ०७/०२/२०२५ |
| ३ | निविदा प्रसिद्ध करणे | १७/०२/२०२५ |
| ४ | प्रथम लखोटा उघडणे | २८/०२/२०२५ |
| ५ | द्वितीय लखोटा उघडणे | २१/०३/२०२५ |
| ६ | संविदा मंजूरी ठराव | ३०/०४/२०२५ |
| ७ | करारनामा करणे कार्यादेश देणे | १३/०५/२०२५ |
| ८ | काम सुरू करणे | १५/०५/२०२५ |
| ९ | काम पूर्ण करणे | १५/०५/२०२६ |
| १० | देयक सादर करणे | २२/०५/२०२६ |
| ११ | देयक प्रदान करणे | २८/०५/२०२६ |

**ठराव** :- सदर कामाकरीता खालील नमूद केलेल्या कालमर्यादा पाळल्या न गेल्यास संबंधित विभाग प्रमुख व त्यांचे अधिनस्त कर्मचारी MCSR १९७९ प्रमाणे कार्यवाहिस पात्र राहतील. तसेच सदर कामामध्ये काही अपरिहार्य कारणास्तव (तांत्रिक, नैसर्गिक व इतर सबब कारणास्तव) विलंब झाल्यास त्या त्या वेळी विलंबास सक्षम प्राधिकाऱ्याची मंजूरी घेणे बंधनकारक असेल.


| अ. क्र | बाब | अपेक्षित दिनांक |
|---|---|---|
| १ | प्रशासकीय व वित्तीय मान्यता ठराव | ०५/०२/२०२५ |
| २ | कार्यकारी तथा शहर अभियंता ह्यांची तांत्रिक मंजूरी घेणे | ०७/०२/२०२५ |
| ३ | निविदा प्रसिद्ध करणे | १७/०२/२०२५ |
| ४ | प्रथम लखोटा उघडणे | २८/०२/२०२५ |
| ५ | द्वितीय लखोटा उघडणे | २१/०३/२०२५ |
| ६ | संविदा मंजूरी ठराव | ३०/०४/२०२५ |
| ७ | करारनामा करणे कार्यादेश देणे | १३/०५/२०२५ |
| ८ | काम सुरू करणे | १५/०५/२०२५ |
| ९ | काम पूर्ण करणे | १५/०५/२०२६ |
| १० | देयक सादर करणे | २२/०५/२०२६ |
| ११ | देयक प्रदान करणे | २८/०५/२०२६ |

तरी वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती जी वॉर्ड क्र १०५ मध्ये नायगाव पुर्व, जूचंद्र येथील नायगाव – बापाणे रस्त्यावर ५ ठिकाणी बॉक्स कल्व्हर्ट बांधणे कामी **मे.हमीद जे शेख** यांचा **अंदाजपत्रकीयदरा पेक्षा ४.९५% जादा दराने** दर हा इतर निविदेंच्या तुलनेत कमी, योग्य व वाजवी आहे. तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७२(३) अन्वये **अंदाजपत्रकीयदरा पेक्षा ४.९५% जादा दाराच्या** निविदेस संविदा करणेस व नामंजूर ठेकेदारांची इसारा रक्कम परत करणेस मान्यता देत आहे. तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषांगिक खर्चास मान्यता देत आहे. तथापी अंदाजपत्रकामधील प्रतेक टप्प्यावरील कामाचे जिओ टॅगिंग फोटोग्राफ सादर करणे आवश्यक राहील तद्नंतरच कामाचे देयक अदा करणेत यावे.

29/04/25

अनिलकुमार पवार(भा.प्र.से)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (प.), जि. - पालघर, पिन नं. 401 303
दुरध्वनी - 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स - 0250-2525107,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र.** 175

विभाग :- पाणी पुरवठा
दिनांक :- 30/04/ 2025

---

**प्रस्तावाचा विषय** :- नगररचना पाणी पुरवठा स्त्रोत विकास शुल्क १००% भरणा केलेल्या विकासक / संस्था / व्यक्ती यांना सुधारीत स्त्रोत विकास शुल्काच्या दरातून वगळण्याकरिता प्रशासकीय ठराव दि.२०/०२/२०२५ क्र.२३२२ अन्वये विहित केलेल्या अटी-शर्ती मध्ये तसा बदल करण्यास मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर** :-

वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील नविन नळजोडणी मंजूर करताना आकारण्यात येणाऱ्या स्त्रोत विकास शुल्क (आकार), नळजोडणी शुल्क तसेच रस्ताखोदाई शुल्कात सुधारणा करण्यास प्रशासकीय ठराव क्र. २३२२ दि.२०/०२/२०२५ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

उक्त मंजूर ठरावाची अंमलबजावणी ठरावाच्या दिनांकापासून करण्याबाबत निर्देश असून विभागाने ठरावाप्रमाणे अंमलबजाणी सुरू केली असता सदर सुधारणा या ठरावाच्या दिनांकापुर्वी "नगररचना पाणीपुरवठा स्त्रोत विकास शुल्क"ज्या विकासकांनी अथवा संबंधीत मालमत्ता धारकांनी १००% भरणा करून भोगवटा प्रमाणपत्र (OC) प्राप्त केले आहे अशा इमारत / मालमत्ता धारकांना सुधारीत दराने आकारणी करण्यात येऊ नये या स्वरुपाच्या तक्रारी महापालिकेस प्राप्त झाल्या असून स्थानिक माजी लोकप्रतिनिधी तसेच स्थानिक आमदार यांनी महापालिकेस कळविले आहे.

उपरोक्त प्रमाणे प्राप्त होणाऱ्या तक्रारी / निवेदनांचा विचार करता प्रशासकीय ठराव क्र. २३२२ दि.२०/०२/२०२५ अन्वये सुधारणा केलेल्या पाणी पुरवठा स्त्रोत विकास शुल्क (आकार) ज्या विकासकांनी अथवा संबंधीत मालमत्ता धारकांनी १००% भरणा करून भोगवटा प्रमाणपत्र (OC) प्राप्त केले आहे अशा इमारत / मालमत्ता धारकांना सुधारीत पाणी पुरवठा स्त्रोत विकास शुल्काच्या दरातून वगळणे अवश्यक आहे. तसेच नव्याने बांधकाम परवानगी अर्ज करणाऱ्या व १००% पाणी पुरवठा स्त्रोत विकास शुल्क दि.२०/०२/२०२५ पुर्वी भरणा न केलेल्या सर्व पाणी मागणी अर्ज करणाऱ्या व्यक्ती/ संस्था/ मालमत्ता यांना लागू ठेवणे आवश्यक आहे.

प्रशासकीय ठराव क्र. २३२२ दि. २०/०२/२०२५ मध्ये वरील प्रमाणे बदल करणे आवश्यक असून उर्वरीत सर्व अटी-शर्ती ठरावास अनुलक्षुन लागु करण्याकरिता प्रस्तावास मा. आयुक्त तथा प्रशासक यांची मान्यता आवश्यक आहे.

तरी प्रशासकीय ठराव क्र. २३२२ दि.२०/०२/२०२५ अन्वये केलेल्या पाणी पुरवठा स्त्रोत विकास शुल्काच्या अटी-शर्तींमध्ये वरील प्रमाणे बदल करण्यास व ठरावातील उर्वरीत सर्व अटी-शर्ती नमुद आहेत त्याप्रमाणे लागु करण्यास प्रस्ताव मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या मान्यतेस्तव सादर.

---

**ठराव -**

१. प्रशासकीय ठराव क्र. २३२२ दि.२०/०२/२०२५ अन्वये पाणी पुरवठा स्त्रोत विकास शुल्क (आकार), नळजोडणी शुल्क व रस्ताखोदाई शुल्क सुधारीत दराने आकारण्यास मान्यता देण्यात आली आहे.

२. वरील नमुद ठरावाची अंमलबजावणी ठरावाच्या दिनांकापासून करण्याचे निर्देश सर्व पाणी पुरवठा विभागांना ठरावाव्दारे देण्यात आले आहेत.

३. ठरावाप्रमाणे विभागाने कार्यवाही सुरू केली असता ठरावाच्या दिनांकापुर्वी १००% पाणी पुरवठा स्त्रोत विकास शुल्क ज्या विकासक/ मालमत्ताधारक यांनी भरणा केला आहे त्यांना सदर सुधारीत दरातून सुट देण्याबाबत प्राप्त होणाऱ्या तक्रारी व निवेदनांचा विचार करून विभागाने वरील प्रमाणे प्रस्ताव सादर केला आहे.

४. विभागाने प्रस्तावित केल्यानुसार दि.२०/०२/२०२५ रोजी पुर्वी प्रचलीत असलेल्या दरानुसार पाणी पुरवठा स्त्रोत विकास शुल्क (आकार) ज्या विकासकांनी अथवा संबंधीत मालमत्ता धारकांनी १००% भरणा करून भोगवटा प्रमाणपत्र (OC) प्राप्त केली आहे अशा फक्त निवासी इमारत / मालमत्ता धारकांना प्रशासकीय ठराव क्र. २३२२ दि.२०/०२/२०२५ अन्वये सुधारीत पाणी पुरवठा स्त्रोत विकास शुल्काच्या दरातून वगळणेत येत आहे.

५. प्रशासकीय ठराव क्र. २३२२ दि.२०/०२/२०२५ अन्वये केलेल्या पाणी पुरवठा स्त्रोत विकास शुल्काच्या अटी-शर्तींमध्ये वरील प्रमाणे बदल करण्यास व ठरावातील उर्वरीत सर्व अटी-शर्तींसह पाणी पुरवठा स्त्रोत विकास शुल्काचे दर (आकार), नळजोडणी शुल्क दर व रस्ताखोदाई शुल्क दर सुधारीत करण्यात आले आहेत ते त्याप्रमाणेच लागु राहतील.

६. नव्याने बांधकाम परवानगी अर्ज करणाऱ्या व पाणी पुरवठा स्त्रोत विकास शुल्क दि.२०/०२/२०२५ पुर्वी १००% भरणा न केलेल्या सर्व पाणी मागणी अर्ज करणाऱ्या व्यक्ती/ संस्था/ मालमत्ता यांना प्रशासकीय ठराव क्र.२३२२ दि.२०/०२/२०२५ अन्वये सुधारीत केलेले सर्व दर दि.२०/०२/२०२५ पासून लागू राहतील.

30/06/25

अनिलकुमार पवार (भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

**वसई विरार शहर महानगरपालिका**
मुख्य कार्यालय विरार (पु), जि.पालघर, पिन.नं.401 305
दुरध्वनी क्र. 2020-2525101/02/03/04/05/06, फॅक्स - -0502525107
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र:-** ९८७६

**विभाग:- बांधकाम विभाग**
दिनांक ३०/०८/२०२५

---

विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती "एच" **कार्यक्षेत्रातील** वॉर्ड क्र. ९५ कौलसिटी येथील कौलसिटी हॉस्पीटल मध्ये विविध दुरुस्ती व इतर अनुषांगिक कामे करणे कामी आयुक्त तथा प्रशासक हयांची आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती "एच" **कार्यक्षेत्रातील** वॉर्ड क्र. ९५ कौलसिटी येथील कौलसिटी हॉस्पीटल मध्ये विविध दुरुस्ती व इतर अनुषांगिक कामे

अंदाजपत्रकीय रक्कम :- रु. ९,८८,५२२/-

प्रस्तावाची गरज :- वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती "एच" कार्यक्षेत्रातील कौलसिटी हॉस्पिटल मधील फ्लोरींग टाईल्स खराब झालेले आहेत. तसेच सुरक्षेसाठी कोलॅपसीबल गेट पार्टीशन तुटलेले आहेत. त्यामुळे पेशंटची गैरसोय होत आहे . तरी दुरुस्ती करणे आवश्यक आहे. सदर जागेची पहाणी करुन सदर कामाचे रु. ९,८८,५२२/- चे अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे.

सदर काम तातडीने हाती घेऊन पूर्ण करणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन शुद्धीपत्रकक्र.सी.ए.टी-२०१७ /प्र.क्र.१८/ इमा.२ दि. २०/०५/२०२१ नुसार रु. १० लक्ष पर्यतची कामे नोटीस बोर्डावर निविदा सुचना मराठी व इंग्रजी भाषेतून प्रसिध्द करण्यात येईल

कामाचे स्वरुप :- **अंतर्गत कामे - वीट बांधकाम, प्लास्टर, फॅबरीकेशन वर्क, टाईल्स, फॉलसिलींग, पी.सी.सी. , प्लंबींग वर्क, स्ट्रील ग्रील वर्क**

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६७ (३) अन्वये मा.आयुक्त तथा प्रशासक हयांची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस प्रस्ताव सविनय सादर.

कामाबाबतचे बाबनिहाय वेळापत्रक

| अ.क्र | बाब | अपेक्षित दिनांक |
|---|---|---|
| 1 | प्रशासकिय व वित्तीय मान्यता ठराव | सक्षम प्राधिकरणाकडुन मंजुरी मिळाल्यानंतर तात्काळ |
| 2 | निविदा प्रसिद्धी करणे | १३/०५/२०२५ |
| 3 | प्रथम लिफाफा उघडणे | २०/०५/२०२५ |
| 4 | व्दितिय लिफाफा उघडणे | २७/०५/२०२५ |
| 5 | संविदा ठराव मंजुरी | ०६/०६/२०२५ |
| 6 | कार्यादेश देणे /करारनामा करणे | १२/०६/२०२५ |
| 7 | काम सुरु करणे | २६/०६/२०२५ |
| 8 | काम पुर्ण करणे | २५/०८/२०२५ |
| 9 | देयक सादर करणे | २९/०८/२०२५ |
| 10 | देयकाचे प्रदान करणे | ०४/०९/२०२५ |
| 11 | उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे | १५/०९/२०२५ |

तरी प्रभाग समिती एच कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ९५ कौलसिटी येथील कौलसिटी हॉस्पीटला मध्ये विविध दुरुस्ती व इतर अनुषांगिक कामे करणे कामी बांधकाम विभामार्फत चालू राज्य दरसुची सन 2022-23 नुसार तयार केलेल्या रक्कम रु. ९,८८,५२२/- अंदाजपत्रकास मा .आयुक्त तथा प्रशासक सो .हयांची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस सविनय सादर.

**ठराव :-**

सदर काम खालील नमूद कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

| अ.क्र | बाब | अपेक्षित दिनांक |
|---|---|---|
| 1 | प्रशासकिय व वित्तीय मान्यता ठराव | सक्षम प्राधिकरणाकडुन मंजुरी मिळाल्यानंतर तात्काळ |
| 2 | निविदा प्रसिद्धी करणे | १३/०५/२०२५ |
| 3 | प्रथम लिफाफा उघडणे | २०/०५/२०२५ |
| 4 | व्दितिय लिफाफा उघडणे | २७/०५/२०२५ |
| 5 | संविदा ठराव मंजुरी | ०६/०६/२०२५ |
| 6 | कार्यादेश देणे /करारनामा करणे | १२/०६/२०२५ |
| 7 | काम सुरु करणे | २६/०६/२०२५ |
| 8 | काम पुर्ण करणे | २५/०८/२०२५ |
| 9 | देयक सादर करणे | २९/०८/२०२५ |
| 10 | देयकाचे प्रदान करणे | ०४/०९/२०२५ |
| 11 | उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे | १५/०९/२०२५ |

सदर कामाकरिता नमुद केलेल्या कालमर्यादा पाळल्या न गेल्यास **संबंधित विभाग प्रमुख व त्यांचे अधिनस्त कर्मचारी** हा MCSR १९७९ प्रमाणे कार्यवाहीस पात्र राहतील तसेच सदर कामामध्ये काही अपरिहार्य कारणास्तव (तांत्रीक, नैसर्गिक व इतर सबक कारणास्तव) विलंब झाल्यास त्या-त्या वेळी विलंबास सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी घेणे बंधनकारक राहील.

तरी वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती एच कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ९५ कौलसिटी येथील कौलसिटी हॉस्पीटल मध्ये विविध दुरुस्ती व इतर अनुषांगिक कामे करणे कामी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ९,८८,५२२/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देणेत येत आहे. सदर काम तातडीने हाती घेऊन पूर्ण करणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन शुध्दीपत्रक क्र.सी.ए.टी.-२०१७/प्र.क्र.१८/इमा. २ दि. २०/०५/२०२१ नुसार रु. १० लक्ष पर्यंतची कामे करण्यास मुभा देण्यात आलेली आहे. सदर कामी तांत्रीक मान्यता घेऊन सदर काम करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच Estimate मधील प्रत्येक टप्प्यावर केलेल्या कामाचे Geotagged फोटोग्राफ्स सादर करणेत यावे . तद्नंतरच कामाची रक्कम अदा करणेत यावी. सदर प्रकरणी उक्त लेखाशिर्षांतर्गत सन २०२४-२५ या वित्तीय वर्षाच्या सुधारीत अर्थसंकल्पात तरतूद करण्याची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

30/04

अनिलकुमार पवार (भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार (प), जि.पालघर, पिन.नं.401 303
दुरध्वनी क्र. 2020-2525101/02/03/04/05/06, फॅक्स - -0502525107
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com


प्रशासकीय ठराव क्र:- ९७७

विभाग:- बांधकाम विभाग
दिनांक ३०/०८/२०२५

| | |
|---|---|
| विषय | :- वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती "एच" मधील वॉर्ड क्र. १०४ मध्ये शिव मंदिर जवळील व उमेळमान येथील शौचालय दुरुस्ती करणे कामी आयुक्त तथा प्रशासक हयांची आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेबाबत. |
| प्रस्तावाचा विषय | :- वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती "एच" कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. १०४ मध्ये शिव मंदिर जवळील व उमेळमान येथील शौचालय दुरुस्ती करणे |
| अंदाजपत्रकीय रक्कम | :- रु. ४,९७,०३२/- |
| प्रस्तावाची गरज | :- वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती "एच" कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. १०४ मध्ये शिव मंदिर जवळील व उमेळमान येथील शौचालयामध्ये भांडे, दरवाजे, टाईल्स नादुरुस्त झाले असून मंदिरामध्ये येणाऱ्या जाणाऱ्या नागरीकांची गैरसोय होत आहे.त्यामुळे तेथील नागरीक व सदस्यांनी वारंवार सुचना केलेल्या आहेत. त्यामुळे सदरील शौचालयाची दुरुस्ती करणे आवश्यक आहे.सदर कामाची प्रत्यक्ष जागेवर जावून पाहणी करुन रक्कम रु. ४,९७,०३२/- चे अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे.<br>सदर काम तातडीने हाती घेऊन पूर्ण करणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन शुद्धीपत्रकक्र.सी.ए.टी-२०१७ /प्र.क्र.१८/ इमा.२ दि. २०/०५/२०२१ नुसार रु. १० लक्ष पर्यतची कामे नोटीस बोर्डावर निविदा सुचना मराठी व इंग्रजी भाषेतून प्रसिध्द करण्यात येईल. |
| कामाचे स्वरुप | :- अंतर्गत कामे - दरवाजे, शौचालय भांडे, टाईल्स इ.<br>१० ठिकाणी शौचालय दुरुस्ती |

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६७ (३) अन्वये मा.आयुक्त तथा प्रशासक हयांची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस प्रस्ताव सविनय सादर.

कामाबाबतचे बाबनिहाय वेळापत्रक

| अ.क्र | बाब | अपेक्षित दिनांक |
|---|---|---|
| 1 | प्रशासकिय व वित्तीय मान्यता ठराव | सक्षम प्राधिकरणाकडुन मंजुरी मिळाल्यानंतर तात्काळ |
| 2 | निविदा प्रसिद्धी करणे | ०९/०५/२०२५ |
| 3 | प्रथम लिफाफा उघडणे | १६/०५/२०२५ |
| 4 | व्दितिय लिफाफा उघडणे | २३/०५/२०२५ |
| 5 | संविदा ठराव मंजुरी | ३०/०५/२०२५ |
| 6 | कार्यादेश देणे /करारनामा करणे | ०६/०६/२०२५ |
| 7 | काम सुरु करणे | ०९/०६/२०२५ |
| 8 | काम पुर्ण करणे | ०८/०७/२०२५ |
| 9 | देयक सादर करणे | १४/०७/२०२५ |
| 10 | देयकाचे प्रदान करणे | १८/०७/२०२५ |
| 11 | उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे | २३/०७/२०२५ |

तरी प्रभाग समिती एच कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. १०४ मध्ये शिव मंदिर जवळील व उमेळमान येथील शौचालय दुरुस्ती करणे कामी बांधकाम विभामार्फत चालू राज्य दरसुची सन 2022-23 नुसार तयार केलेल्या रक्कम रु. ४,९७,०३२/- अंदाजपत्रकास मा .आयुक्त तथा प्रशासक सो .हयांची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस सविनय सादर.

**ठराव :-**

सदर काम खालील नमूद कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित आहे


| अ.क्र | बाब | अपेक्षित दिनांक |
|---|---|---|
| 1 | प्रशासकिय व वित्तीय मान्यता ठराव | सक्षम प्राधिकरणाकडुन मंजुरी मिळाल्यानंतर तात्काळ |
| 2 | निविदा प्रसिद्धी करणे | ०९/०५/२०२५ |
| 3 | प्रथम लिफाफा उघडणे | १६/०५/२०२५ |
| 4 | व्दितिय लिफाफा उघडणे | २३/०५/२०२५ |
| 5 | संविदा ठराव मंजुरी | ३०/०५/२०२५ |
| 6 | कार्यादेश देणे /करारनामा करणे | ०६/०६/२०२५ |
| 7 | काम सुरु करणे | ०९/०६/२०२५ |
| 8 | काम पुर्ण करणे | ०८/०७/२०२५ |
| 9 | देयक सादर करणे | १४/०७/२०२५ |
| 10 | देयकाचे प्रदान करणे | १८/०७/२०२५ |
| 11 | उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे | २३/०७/२०२५ |

सदर कामाकरिता नमुद केलेल्या कालमर्यादा पाळल्या न गेल्यास संबंधित विभाग प्रमुख व त्यांचे अधिनस्त कर्मचारी हा MCSR १९७९ प्रमाणे कार्यवाही पात्र राहतील सदर कामामध्ये काही अपरिहार्य कारणास्तव (तांत्रीक, नैसर्गिक व इतर सबक कारणास्तव) विलंब झाल्यास त्या-त्या वेळी विलंबास सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी घेणे बंधनकारक राहील.

तरी वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती एच कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. १०४ मध्ये शिव मंदिर जवळील व उमेळमान येथील शौचालय दुरुस्ती करणे कामी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ४,९७,०३२/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देणेत येत आहे. तसेच सदर काम तातडीने हाती घेऊन पूर्ण करणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन शुध्दीपत्रक क्र.सी.ए.टी.-२०१७/प्र.क्र.१८/इमा-२ दि. २०/०५/२०२१ नुसार रु.१० लक्ष पर्यंतची कामे करण्यात मुभा देण्यात आली आहे. सदर कामी कामाचे बील अदा करणेत यावे. सदर प्रकरणी उक्त लेखाशिर्षांतर्गत सन २०२४-२५ या वित्तीय वर्षाच्या सुधारीत अर्थसंकल्पात तरतूद करण्याची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

30/04

अनिलकुमार पवार (भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका